रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३४६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २३ मे २०२४

किंमत ४₹

## गृह मंत्रालयाला धमकी

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या नॉर्थ ब्लॉकमध्ये असलेल्या गृह मंत्रालयाच्या कार्यालयाला बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ईमेल प्राप्त झाला असल्याचे पोलिसांनी बुधवारी सांगितले. यानंतर तात्काळ बॉम्ब शोधक पथक आणि अग्निशामक बंब घटनास्थळी पाठविण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नॉर्थ ब्लॉक पोलिसांना धमकीचा ईमेल मिळाल्यानंतर डीएफएसने (दिल्ली फायर सर्विस) हालचाल करत बॉम्बशोधक पथक घटनास्थळी पाठविले. पोलिसांनी सांगितले की, आमचा शोध सुरू आहे. पान २ वर




### उजनी, भावली आणि इगतपुरी येथील घटना

# राज्यात १३ जणांचा बुडून मृत्यू

। नाशिक/सोलापूर । वृत्तसंस्था ।

राज्यात गेल्या २४ तासांमध्ये वेगवेगळ्या घटनांमध्ये तब्बल १३ जणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. उजनी धरणाच्या बॅक वॉटरमध्ये बोट पलटून झालेल्या अपघातामध्ये सहा जण बेपत्ता झाले आहेत. गेल्या २० तासांपासून त्यांचा शोध घेऊनही अजूनही कोणीच हाताशी न लागल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये सात जणांचा बुडून मृत्यू झाला. इगतपुरीमध्ये मायलेकींचा विहिरीमध्ये बुडून मृत्यू झाला. चिमुकल्या लेकीला वाचवण्याच्या नादात आईचा मृत्यू झाला. नाशिकमध्ये भावली धरणामध्ये मामा आणि चार भाच्यांचा एकापाठोपाठ बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. पर्यटनाचा आनंद घेतल्यानंतर धरणाच्या पाण्यात डुबकी मारण्याचा निर्णय जीवावर बेतला. त्यामुळे गेल्या २४ तासांमध्ये तीन घटनांमध्ये १३ जणांचा बळी गेला आहे.

उजनी धरणात बुडालेले सहा जण

### इगतपुरीत मायलेकींचा मृत्यू

**भावली धरणात पाच जणाचा बुडून मृत्यू झाला असल्याची घटना ताजी असतानाच विहिरीत बुडून माय लेकींचा दुर्दैवी मृत्यू झाला. इगतपुरी तालुक्यातील मुंढे गावजवळील शेनवड खुर्द गावामध्ये ही घटना घडली. २३ वर्षीय महिला प्रियंका दराणे शेतात काम करत होती. ३ वर्षीय मुलगी विहिरीजवळ गेल्यानंतर पाण्यात पडली. तिला वाचविण्यासाठी महिलेने उडी मारल्याने तिचाही मृत्यू झाला. विहिरीला संरक्षक कठडा नसल्याने ही दुर्दैवी घटना घडली.**

### मामा-भाच्यांसह पाच जणांचा मृत्यू

**दरम्यान, इगतपुरीमधील भावली धरणात बुडून मामा-भाचे अशा एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला. यामध्ये दोन मुले आणि तीन मुलींचा समावेश आहे. हनिफ शेख (२४) भाचा अनस खान दिलदार खान (१५), नाझिया खान (१५), मीजबाह खान (१६) आणि ईकरा खान (१४ सर्व रा. गोसावीवाडी, नाशिकरोड) यांच्यासोबत पर्यटनासाठी इगतपुरी तालुक्यातील भावली धरणावर गेले होते. पर्यटनाचा आनंद लुटल्यानंतर धरण्याच्या पाण्यात डुबकी मारण्याचा धाडसी निर्णय या तरुणांनी घेतला आणि तोच त्यांच्या जीवावर बेतला. पाण्यात दोन जण बुडत होते, त्यांना वाचविण्यासाठी इतरांनी उडी मारली.**





दरम्यान, उजनी धरणात बुडालेले सर्व सहा जण करमाळा तालुक्यातील कुगाव व झरे या गावातील आहेत. त्यामुळे परिसरावर कालपासून शोककळा पसरली आहे. झरे गावातील गोकूळ दत्तात्रय जाधव (वय ३०), कोमल गोकूळ जाधव (वय २५), शुभम गोकूळ जाधव (वय दीड वर्ष), माही गोकूळ जाधव (वय३, रा. झरे, ता. करमाळा, जि. सोलापूर), हे अजून सापडलेले नाहीत. काल रात्रीपासून कुगाव व झरे गावातील गावकरी मोठ्या संख्येने दोन्ही तीरावर गोळा झाले आहेत. एनडीआरएफ टीमकडून युद्धपातळीवर शोध सुरू आहे. मात्र, अद्याप एकाच देखील शोध लागलेला नाही. करमाळा आदिनाथ कारखान्याचे चेअरमन धनंजय डोंगरे यांचा मुलगा गौरव सुद्धा बुडाला आहे. उजनी धरणाच्या जलाशयात राजरोसपणे सुरू असलेली बेकायदा जलवाहतूक सहा जणांच्या जीवावर बेतली आहे. करमाळा तालुका आणि इंदापूर तालुका पान २ वर

### रिलायन्सच्या ठेकेदारीवरुन हाणामारी

# आरोपींना २६ मे पर्यंत पोलीस कोठडी

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्याजवळील रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनीत कामगार पुरविणे तसेच ठेकेदारी पद्धतीने कामे करणे यावरून नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील शिहू - मुंढाणी (ता. पेण) परिसरात राहणाऱ्या दोन गटात वाद निर्माण होत हाणामारी होऊन तलवारीचे वार करण्याची घटना सोमवार दि. २० रोजी रात्री ११.४५ वाजण्याच्या सुमारास मुंढाणी फाटा येथे घडली होती. नागोठणे पोलिसांकडून याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आठही आरोपींना मंगळवारी पेण येथील प्रथम वर्ग फौजदारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने आठही आरोपींना २६ मे पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

या घटनेतील परस्परविरोधी तक्रारीतील फिर्यादी व आरोपी यांचे रिलायन्स कंपनीत कामगार पुरविणे यावरून वाद निर्माण झाले होते. हा

> रिलायन्स कंपनीत असणारे ठेकेदार यांचे बाहेर आपापसांत काय वाद आहेत.याच्याशी कंपनीचा काहीही संबंध नाही. त्या दोन गटांची झालेली भांडणे ही त्यांच्यात काही इतर कारणावरून पण असू शकतात. त्यामुळे शिहू फाट्यावर झालेल्या या दोन गटातील भांडणाचा रिलायन्स कंपनीशी काहीही संबंध नाही.
> – रमेश धनावडे, जनसंपर्क अधिकारी, रिलायन्स, नागोठणे

वाद इतका विकोपाला गेला की, त्याचे रुपांतर तुंबळ हाणामारीत झाले. यावेळी या हाणामारीत संकेत उर्फ संकेश शैलेश चोरगे (रा. बेणसे,ता.पेण) याच्या मानेवर तलवारीने वार केल्याने तो गंभीररित्या जखमी झाला. त्याला पेण येथील डॉ.म्हात्रे यांच्या खाजगी रुग्णालयात उपचारार्थ पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**या देशात हेही घडते**

**वे|ध|क**

### ग्रंथनिर्मिती मंडळाच्या पुनरुज्जीवनाची मागणी

**पुणे :** मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने मराठी भाषा विभागास किमान दीडशे कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करावी. उच्च शिक्षण मराठीतून देण्याच्या निर्णयाची कार्यवाही करण्यासाठी पाठ्यपुस्तके आणि पूरक ग्रंथांची निर्मिती करण्यासाठी मराठी ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवन करावे, अशी मागणी भाषा सल्लागार समितीने राज्य शासनाकडे केली आहे. भाषा सल्लागार समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये उच्च शिक्षण मराठीतून देण्याच्या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी काय करता येईल या संदर्भातील कृती पान २ वर

### दहावी-बारावीच्या परीक्षा होणार लवकर

**पुणे :** पुढील वर्षीपासून बारावी आणि दहावीची परीक्षा काही दिवस अलीकडे घेण्याची चाचपणी राज्य मंडळाकडून करण्यात येत आहे. नियमित परीक्षा लवकर झाल्याने पुरवणी परीक्षाही लवकर घेतली जाऊ शकते. तसेच, पुढील वर्षी प्रचलित पद्धतीनेच परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली. दरवर्षी बारावीची परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये, तर दहावीची परीक्षा मार्च-एप्रिलमध्ये घेतली जाते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये दहावी आणि बारावीला सत्र परीक्षा घेण्याबाबत सुचवण्यात आले आहे. मात्र, दहावी आणि पान २ वर

# ट्रक अपघातात एक ठार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जतमध्ये लाकडांची वाहतूक करणारा ट्रक उलटून झालेल्या अपघातात एक ठार तर तीन गंभीर जखमी झाले. हा अपघात वारे कुरुंग या जंगल परिसरातील रस्त्यावर बुधवारी (दि.२२) घडला. झाडांची लाकडे भरून भिवंडी दिशेला निघालेला ट्रक रस्त्याच्या वळणाच्या उताऱ्यावर आला असता ट्रकमधील लाकडे ड्रायव्हर केबिनवर आदळून विचित्र अपघात घडला. यामध्ये ४२ वर्षीय नसीम अन्सारी यांचा मृत्यू झाला.

मंगळवारी भिवंडी-पडघा येथून तीन ते चार ट्रक हे कर्जत तालुक्यातील वारे कुरुंग या परिसरात आले होते. रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास हेच ट्रक तोडलेल्या झाडांच्या लाकडांची भरणी करून पुन्हा भिवंडीच्या दिशेने निघाले. अपघातग्रस्त ट्रकमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात आणि मोठी लाकडे भरली होती. दरम्यान हा ट्रक कुरुंग ताडवाडी या रस्त्याच्या वळणावर असताना ट्रकमधील लाकडे ड्रायव्हर केबिनवर आदळली. यामध्ये ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रक रस्त्याच्या कडेला खोल खड्ड्यात उलटला. यावेळी ट्रकमध्ये चालकासह क्लिनर तर अन्य दोन जण असे मिळून चार जण होते. या अपघातात ट्रकचा ड्रायव्हरकडील केबिन भाग अक्षरशः तुटून यामध्ये नसीम पान २ वर



- **वारे -कुरुंग जंगलात झाडांची तस्करी**
- **ट्रकमधील तीन जण गंभीर जखमी**

# रायगडमधील १०३ गावांना दरडींचा धोका

। रायगड । प्रतिनिधी ।

भूवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वे क्षणात रायगड जिल्ह्यातील १०३ गावांना दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या संभाव्य दरडग्रस्त गावांना पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरडग्रस्त गावात प्रतिबंधात्म क उपाययोजना करण्याचे निर्देश जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या वैज्ञानिकांनी दिले आहेत.गावनिहाय कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. संभाव्य दरडग्रस्त गावांसाठी शासनाने कृती आराखडा तयार केला आहे. गावनिहाय आपत्ती व्यवस्थापनासाठी एका अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. स्थलांतरित कराव्या लागणाऱ्या कुटुंबांची यादी तयार करण्यात आली असून, त्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्याचे नियोजन केले जात आहे.

> अतिधोकादायक श्रेणी आणि धोकादायक श्रेणीतील नागरिकांना पावसाळ्यापूर्वी सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या गावांमध्ये करावयाच्या उपाययोजनांबाबत तातडीने पाऊले उचलण्यास सांगण्यात आले आहे.
> – किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड



**तालुकानिहाय संभाव्य दरडग्रस्त गावे**

- महाड– ४९
- पोलादपुर– १५
- रोहा– १३
- म्हसळा– ६
- माणगाव– ५
- पनवेल– ३
- खालापूर– ३
- कर्जत– ३
- सुधागड– ३
- श्रीवर्धन– २
- तळा– १

जिल्ह्यात २००५ मध्ये झालेल्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये २१२ हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. २०२१ मध्ये तळीये गावावर दरड कोसळली होती. ज्यात ८४ जणांचा मृत्यू झाला होता. तर गेल्या वर्षी इरशाळवाडी येथे दरड कोसळून ८४ जण दगावले होते. सातत्याने होणाऱ्या या घटनेची दखल घेऊन जिल्ह्यातील संभाव्य दरडग्रस्त गावाचे जिऑलॉजिकल सर्व्हे पान २ वर

# आरोग्यसेवक, ग्रामसेवक परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

। नागपूर । वृत्तसंस्था ।

जिल्हा परिषदेच्या आरोग्यसेवक आणि ग्रामसेवक पदाच्या भरतीसाठी अर्ज भरून चार महिने झाले आहे. मात्र, परीक्षेच्या तारखा घोषित न झाल्याने विद्यार्थी संभ्रमात होते. त्यामुळे ग्रामविकास विभागाने परीक्षांच्या तारखांबाबत निवेदन प्रसिद्ध करावे, अशी मागणी स्पर्धा परीक्षा समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली होती. यानंतर आता परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले असून १० जूनपासून विविध परीक्षांना सुरुवात होणार आहे.

अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदेची भरती वादग्रस्त ठरत असून, नव्याने घोषित झालेली भरतीही अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. परीक्षा या लवकरात-लवकर घेण्यात याव्यात पण उमेदवारांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळेल, यादृष्टीने किमान ३० दिवस आधी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणीही उमेदवारांच्या वतीने करण्यात आली होती. ग्रामसेवक, आरोग्य सेवकांच्या परीक्षांना जून नंतरचाच मुहूर्त मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. पान २ वर

**असे आहे परीक्षेचे वेळापत्रक**

**आरोग्य सेवक पुरुष– १०,११ आणि १२ जून, आरोग्य सेवक पुरुष हंगामी फवारणी– १३,१४,१५ जून, सहाय्यक परिचारिका १६ जून, ग्रामसेवक १६,१८,१९,२०,२१ जून.**

### सांगलीत वीज कोसळून एक ठार

। सांगली । वृत्तसंस्था ।

कर्नाटक सीमेवर असलेल्या चाबूकस्वारवाडी गावात वीज पडून एक जण ठार तर दोन जण जखमी झाले. जोरदार वारे आणि विजेचा कडकडाट यापासून बचाव करण्यासाठी घराजवळ असलेल्या शौचालयाच्या आडोशाला उभ्या राहिलेल्या मजूरांच्या अंगावर वीज कोसळल्याने ही दुर्घटना घडली. विजेचा कडकडाट सुरू झाल्याने विहीर खुदाईचे काम करणारे सुभाष नाईक आणि सहदेव धोतरे व संदीप पवार हे आडोशाला थांबले होते. यावेळी अचानक वीज कोसळल्याने नाईक यांचा जागीच मृत्यू झाला. तर दोघे जखमी झाले. यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याने रात्री उशिरा मिरजेतील खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

# पहिल्याच दिवशी मिळणार गणवेश

**सुयोग आंग्रे**

। रायगड ।

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्वच विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मिळणार आहेत. यंदा प्रथमच निधीऐवजी महिला आर्थिक विकास महामंडळाला (मआविम) थेट कापड देऊन गणवेशाची शिलाई देणार आहेत. जिल्ह्यातील 'मआविम'कडील बचत गटांमधील सुमारे ६०० महिला गणवेश शिवणार आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना एक गणवेश देण्याचे नियोजन आहे.

रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील एक लाख ३८९ विद्यार्थ्यांना २०२४-२५ च्या शैक्षणिक वर्षात प्रत्येकी दोन गणवेश दिले जाणार आहेत. त्यात एक स्काऊट गाइडचा तर दुसरा नेहमीचाच गणवेश असणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या नव्या निर्णयानुसार बचत गटांमधील महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे. एक गणवेश शिलाई केल्यावर सुमारे १२० रुपये मिळणार आहेत. पहिल्या टप्प्यात महिला आर्थिक विकास महामंडळाकडील ६०० महिलांकडे जिल्ह्यातील एक लाख गणवेश शिलाईचे काम येणार आहे. त्यानंतर काही दिवसांनी पुन्हा दुसऱ्या गणवेशासाठी कापड येणार आहे. विशेष बाब म्हणजे यंदा विद्यार्थ्यांच्या अंदाजित मापानुसार राज्य स्तरावरूनच कटिंग केलेले कापड 'मआविम'ला पाठविले जाणार आहे.

रायगड जिल्ह्यात महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळाच्या अंतरंगात असणारे युनिट पूर्ण जिल्ह्यात कार्यरत आहेत. यामध्ये रोहा, श्रीवर्धन, महाड, पान २ वर

- **६०० महिला शिवणार एक लाख विद्यार्थ्यांचे गणवेश**
- **शासनाकडून 'मआविम'ला मिळणार कापड**

> **महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळामार्फत दोन लाख ७७८ गणवेश शिलाई केले जाणार आहेत. महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळाकडे कापड उपलब्ध झाल्यानंतर तातडीने गणवेश शिलाईचे काम सुरु केले जाणार आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश शिवून देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे, असे महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अशोक चव्हाण यांनी सांगितले.**





# रस्त्यांच्या कडेला अनधिकृत फलक

## बांधकाम खात्याकडून नोटिसा

। नेरळ । प्रतिनिधी ।

**मुंबई घाटकोपर येथे झालेल्या दुर्घटनेनंतर कर्जत तालुक्यात रस्त्यांच्या कडेला असलेल्या सर्व जाहिरात फलक यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.कर्जत तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांच्या बाजूला असलेले सर्व जाहिरात फलक हे अनधिकृत असून ते फलक काढण्यात यावेत अशा नोटिसा बांधकाम खात्याने बजावल्या आहेत.**

कर्जत तालुका फार्म हाऊस आणि सेकंड होम यांचा तालुका म्हणून ओळखला जातो. त्यात या तालुक्यात मोठ्या प्रमाणावर लहान लहान रिसोर्ट उभे राहिले आहेत. या सर्व रिसोर्ट आणि फार्म हाऊसमध्ये पर्यटनासाठी येणारे पर्यटक यांची संख्या मोठी आहे. हे लक्षात घेवून मुंबई येथून कर्जत तालुक्यात येणारे चौक आणि खोपोली येथील रस्त्यांच्या आजूबाजूला जाहिरात फलक यांचा गराडा पडला आहे. चौक ते कर्जत या नऊ किलोमीटर अंतरावर तब्बल १००हून अधिक जाहिरात फलक आहेत. त्यानंतर कर्जत चार फाटा येथील हुतात्मा भाई कोतवाल चौकात सर्वाधिक जाहिरात फलक उभे होते.मात्र त्या ठिकाणी जंक्शन विकास कार्यक्रम साठी शासनाने दोन कोटींचा निधी मंजूर केला आहे.परिणामी अनधिकृत असलेले अनेक जाहिरात फलक सार्वजनिक बांधकाम खात्याने काढून टाकले.त्यापुढे कर्जत तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व महत्वाच्या रस्त्यांच्या आजूबाजूला जाहिरात फलक उभे आहेत.नेरळ कळंब रस्त्यावर कोल्हारे साई मंदिर येथे देखील सर्वाधिक जाहिरात फलक असून ते सर्व अनधिकृतपणे उभे आहेत.

मुंबई घाटकोपर येथील दुर्घटना घडल्यानंतर कर्जत तालुक्यातील जाहिरात फलक यांचा विषय समोर आला.कर्जत चार फाटा येथील अनेक जाहिरात फलक हे अपघात ग्रस्त स्थितीत उभे असून तेथे असलेलं सर्व जाहिरात फलक हे अनधिकृतपने उभे केलेले आहेत. त्या जाहिरात फलकावर जाहिराती लावून लाखो रुपये वर्षाला कमविले जात आहेत.मात्र त्या बदल्यात शासनाला एक रुपयाचा देखील महसूल भरला जात नाही.त्यामुळे शासनाने सर्व अनधिकृत फलक काढून टाकण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि राज्य रस्ते विकास महामंडळ यांना दिले आहेत.त्यामुळे कर्जत तालुक्यातील सर्व जाहिरात फलक काढण्यात यावेत अशी लेखी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजीव वानखेडे यांनी दिली आहे.त्याचवेळी संबंधित नोटीस मध्ये अनेक जाहिरात फलक हे शासनाची परवानगी घेवून आणि रीतसर महसूल भरून उभे करण्यात आले नसल्याने तत्काळ काढून टाकण्यात यावेत.

अन्यथा ते जाहिरात फलक सार्वजनिक बांधकाम विभाग हलावेल असेही नमूद करण्यात आले आहे.तर सार्वजनिक बांधकाम विभाग कडून दिलेल्या नोटीसमध्ये कोणतीही दुर्घटना घडली तर त्यास संबंधित जाहिरात फलक मालक हे जबाबदार असतील असे स्पष्ट करण्यात आले आहेत.सर्व जाहिरात फलक हे राज्य मार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग यांचे ठरवून दिलेल्या जागेमध्ये असल्याने त्यांना कोणीही परवानगी दिली नाही आणि शासन आपल्या जागेत जाहिरात फलक उभे करण्यास परवानगी देखील देणार नाही असे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## शर्यतीमधील बैलांच्या इअरटॅगला विरोध

**महाड :** शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या बैलांच्या कानाला टॅग लावण्यास महाड, पोलादपूर तालुका बैलगाडी स्पर्धा पंच समितीने विरोध दर्शविला आहे. तशा प्रकारचे निवेदन समितीतर्फे जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या सहायक आयुक्त डॉ. शुभांगिनी कवटे यांना दिले आहे. यावेळी महाड पोलादपूर तालुका बैलगाडी स्पर्धा पंच समितीचे उपाध्यक्ष स्वरूप खांबे, कार्याध्यक्ष अनिल कोदेरे उपस्थित होते. महाराष्ट्र सरकारने काढलेल्या परिपत्रकानुसार, कानाला टॅग नसलेल्या बैलांना बैलगाडी शर्यतीमध्ये सहभागी होता येणार नाही व तसेच पशुधन संदर्भातील वैद्यकीय सोयी सुविधा व योजनांचा लाभ पशुपालकांना मिळणार नाही, असे नमूद केले आहे.

# अलिबाग-मुंबई प्रवास सेवा अटल सेतू मार्गे सुरू करा

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यात प्रवासी वर्गाला होणारा त्रास लक्षात घेऊन अलिबाग-मंत्रालय-मुंबई प्रवासी सेवा अटल सेतूमार्गे सुरू करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिलीप जोग यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अलिबाग-गेटवे ऑफ इंडिया ही जलवाहतुक प्रवासी सेवा पावसाळ्यात साधारणतः तीन महिन्यासाठी बंद ठेवण्यात येते. अलिबागवरुन मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी महामंडळाच्या गाड्या असल्या तरीही मुंबईला जाण्यासाठी प्रवासाचा जास्त वेळ लागतो. त्यामुळे अलिबाग आणि परिसरातील नागरिक, व्यापारी, वैद्यकीय उपचारासाठी जाणारे रुग्ण, उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होते. तसेच पावसाळ्यात अलिबाग आणि परिसरात येणाऱ्या पर्यटकांनाही या अडचणींना सामोरे जावे लागते.

नागरिक व प्रवाशांची समस्या लक्षात घेऊन २५ मे ते २१ सप्टेंबर या कालावधीत सकाळी ६, ७, ८ वाजता व संध्याकाळी मंत्रालय येथून ४, ५ व ६ वाजता परतीच्या प्रवासासाठी अटल सेतू मार्गे शिवशाही आणि साध्या गाड्या सोडण्यात याव्या, अशी मागणी जोग यांनी केली आहे.

सोमवारी अलिबाग येथून आणि शुक्रवारी मंत्रालय मुंबई येथून नमूद केलेल्या वेळेव्यतिरिक्त, अतिरिक्त गाड्या सोडल्यास त्यालाही प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद मिळेल. याबाबत आपल्याकडून संबंधित विभागाला आणि उपाध्यक्ष तथा कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांना सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिलीप जोग यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे.

पान १ वरुन

## राज्यात १३ जणांचा बुडून मृत्यू

यांच्यामध्ये भीमा नदी असून यावरच उजनी धरण बांधण्यात आले आहे. यामुळे या परिसरात धरणाच्या जलसाठ्यामुळे अथांग पाणी पसरले आहे. करमाळ्यातून इंदापूरकडे रोडमार्गे प्रवास करण्यासाठी १०० किमीचा वळसा मारावा लागतो. यासाठी तीन तासांपेक्षा जास्त वेळ लागतो. मात्र, बोटीतून केवळ ५ ते ७ किलोमीटर पाण्यातून हा धोकादायक प्रवास केल्यावर तासाभरात पलीकडे इंदापूर तालुक्यात जाता येते.

## गृह मंत्रालयाला धमकी

आतापर्यंत आम्हाला काहीही संशयास्पद आढळलेले नाही. गेल्या काही दिवसांपासून दिल्लीमध्ये लागोपाठ बॉम्बच्या धमक्या दिल्या जात आहेत. शाळा, विमानतळ, रुग्णालय आणि तुरुंगाना बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली गेली आहे. दिल्लीच्या व्यतिरिक्त जयपूर, लखनऊ, कानपूर आणि अहमदाबाद येथील शाळांनाही बॉम्बने उडविण्याची धमकी मिळाली आहे. दिल्लीमधील शाळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर जवळपास १५० शाळांमधील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना तात्काळ बाहेर काढले गेले होते. मेल डॉट आरयू या नावाच्या सर्व्हरमधून बॉम्बची धमकी देणारा ईमेल आला होता. दिल्लीमधील शाळांमध्ये स्फोटके लपविल्याची धमकी दिली गेली. या धमक्यांचा तपास करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, रशियाच्या ईमेलवरून या धमक्या दिल्या गेल्या होत्या. आरोपीने व्हिपीएनचा वापर केल्यामुळे त्याच्या आयपी अॅड्रेसचा शोध घेणे कठीण जात आहे. ज्या व्यक्तीने ईमेल तयार केला, त्याला शोधण्यासाठी आम्ही इंटरपोलची मदत घेत आहोत. ६ मे रोजी गृह मंत्रालयाने अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी एसओपी जाहीर केली जाईल, असे सांगितले. गृह सचिवांनी दिल्ली पोलिसांना निर्देश देऊन अफवांमुळे तणावाची परिस्थिती उद्भवू नये, यासाठी खबरदारी घेण्यास सांगितले. तसेच सुरक्षा व्यवस्थेचा बंदोबस्त करून शाळांमधील सीसीटीव्ही चित्रणाचे परिक्षण करण्यास सांगितले.

## ग्रंथनिर्मिती मंडळाच्या पुनरुज्जीवनाची मागणी

आराखडा निश्चित करण्यात आला. त्यामध्ये ही मागणी करण्यात आली असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी दिली.

देशमुख म्हणाले, की इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दहावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्यात आला आहे. मराठी विषय अकरावी-बारावीलाही सक्तीचा करण्याचे मान्य झाले आहे. त्यासाठी कायद्यामध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव असून, ती दुरुस्ती झाल्यानंतर पुढल्या वर्षीपासून हा कायदा लागू होईल. उच्च शिक्षण मराठीतून देण्याचा निर्णय झाला आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी जे विषय इंग्रजीतून शिकविले जातात, त्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके आणि पूरक संदर्भ ग्रंथांची निर्मिती करून छपाई करण्याच्या कामासाठी मराठी ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी केली आहे. यंदा पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमाची तयारी केली, तर पुढच्या वर्षी मराठीतून पाठ्यपुस्तके मिळू शकतील, असा कृती आराखडा शासनाला सादर करण्यात आला आहे. भाषा धोरणाचा मसुदा राज्य शासनाने संमत केला आहे. या मंजूर धोरणामध्ये समाविष्ट न झालेल्या शिफारशींपैकी महत्त्वाच्या शिफारशींसंदर्भात शासनाने पुनर्विचार करून त्यांचा धोरणामध्ये अंतर्भाव करावा, यासाठी समिती आग्रही आहे. मराठी भाषा प्राधिकरण कायदा करावा, असे धोरणामध्ये समाविष्ट केले आहे. त्याचाही पाठपुरावा करण्यात येणार आहे. बँकांनी चेकबुक मराठीमध्ये करावे ही समितीची आग्रहाची मागणी असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

## दहावी-बारावीच्या परीक्षा होणार लवकर

बारावीच्या परीक्षेला सुमारे ३२ लाख विद्यार्थी बसतात. ही संख्या खूप मोठी आहे. त्यामुळे सत्रनिहाय परीक्षा घेतल्यास शिक्षक, कर्मचारी आणि राज्य मंडळाच्या अधिकाऱ्यांचा वेळ हा परीक्षा आयोजन ते निकाल जाहीर करणे यातच जाईल. त्याचा परिणाम शैक्षणिक कामकाजावर होऊ शकतो. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानेही सत्र परीक्षांऐवजी पुरवणी परीक्षेचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने सध्याच्या वेळापत्रकात बदल करून पुढील वर्षी बारावी, दहावीची परीक्षा काही दिवस आधी घेण्याबाबत प्रयत्न आहे. त्यामुळे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात बारावीची परीक्षा सुरू होईल. परीक्षा लवकर झाल्याने निकालही लवकर जाहीर होईल. तसेच पुरवणी परीक्षाही लवकर घेता येईल. हीच प्रक्रिया दहावीची परीक्षा, निकाल, पुरवणी परीक्षेसंदर्भातही होईल, असे गोसावी यांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम आराखडा, अभ्यासक्रम तयार करण्याचे काम राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) करत आहे. त्यानंतर राज्य शासनाकडून पुढील निर्णय घेतला जाईल. राज्य शासनाच्या धोरणानुसार दहावी, बारावीच्या परीक्षांमध्ये बदल केले जातील. मात्र, तोपर्यंत प्रचलित पद्धतीनेच परीक्षा होणार आहे, असेही गोसावी यांनी स्पष्ट केले.

## आरोग्यसेवक, ग्रामसेवक परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

लोकसभेच्या निवडणुकांचे निकाल ४ जून रोजी हाती येतील त्यानंतर या प्रक्रियेला वेग येईल. मागील काही महिन्यांपासून भरती प्रक्रिया सुरू आहे. अर्ज भरून चार महिने लोटले आहेत. पण, परीक्षेची तारीख निश्चित करण्यात आली नाही. त्यामुळे परीक्षा केव्हा घेतली जाणार? या विचाराने ग्रामसेवक आणि आरोग्य सेवक भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांचा जीव टांगणीला लागला होता.

ग्रामसेवक, आरोग्यसेवक पदांच्या हजारो रिक्त जागांसाठी लाखो उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. चार महिन्यांपासून परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली नाही. त्यामुळे लाखो विद्यार्थी परीक्षेची वाट पाहत होते. ही परीक्षा लवकर घ्यावी. मात्र, उमेदवारांना कमीत कमी एक महिना अभ्यासासाठी वेळ मिळेल अशा पद्धतीचा परीक्षेचा कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने शासनाकडे केली होती. यातच आता परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्याने उमेदवारांना दिलासा मिळणार आहे.

## शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश

कर्जत, अलिबाग येथील युनिट कार्यतत्पर यंत्रणेसह गणवेश शिलाईसाठी सज्ज ठेवण्यात आले आहेत. या युनिटमधील तब्बल ६०० महिलांना गणवेश शिलाईचे काम देण्यात येणार आहे. चार-पाच दिवसांत विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे कापड मिळणार आहे, असे अशोक चव्हाण म्हणाले.

## आरोपींना २६ मे पर्यंत पोलीस कोठडी

दाखल करण्यात आले आहे. तर दिपक कमलाकर घासे (रा. मुंढाणी,ता. पेण) याच्याही हाताला गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याने फ्रॅक्चर झाले असून त्याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर या तुंबळ हाणामारीत इतरही काही जणांना किरकोळ जखमा झाल्या आहेत.

## रायगडमधील १०३ गावांना दरडींचा धोका

ऑफ इंडियाच्या भूवैज्ञानिकांमार्फत सर्वेक्षण करण्ययात आले होते. यात प्रामुख्याने डोंगर उतारावरील गावांचा समावेश होता. नैसर्गिक धोके सौम्यीकरण पथदर्शी प्रकल्पा आंतर्गत ही पाहणी करण्यात आली होती. या आंतर्गत सुरुवातीला जिल्ह्यातील ८४ गावांचा दरडग्रस्त गावांमध्ये समावेश करण्यात आला होता. मात्र आता ही संभाव्य दरडग्रस्त गावांची संख्या १०३ वर पोहोचली आहे. रायगडमधील ९ गावे (वर्ग १) अतिधोकादायक, ११ गावे (वर्ग २) धोकादायक व ८३ गावे वर्ग ३) सौम्य धोकादायक आहेत.

डोंगर उताररावरील वृक्ष तोड, बेकायदा खोदकाम, पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गात अडथळे, पावसाळी हंगामात जमिनीस भेगा पडणे, अस्थिर भूभागावरील बांधकाम ही दरड कोसळण्याची प्रमुख कारण आहेत असल्याचे या सर्वेक्षणात दिसून आले आहे. पुणे येथील भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (जीएसआय) विभागाच्या शास्त्रज्ञांनी या गावांना भेट देऊन पहाणी केली. या पहाणीत शास्त्रज्ञांच्या अनेक धक्कादायक बाबी नजरेसमोर आल्या आहेत. त्याचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला आहे. दरम्यान १०३ दरडग्रस्त गावांमध्ये अनेक उपाययोजना करण्यात याव्यात यासाठी भूवैज्ञानिकांनी काही सुचना केल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.जिल्ह्यातील संभाव्य दरडग्रस्त गावांमधील धोका कमी करण्यासाठी भूवैज्ञानिकांनी काही उपाययोजना सूचविल्या आहेत. यात प्रामुख्याने या परीसरातील खाणकाम आणि उत्खननावर निर्बंध घालण्यात यावे, डोंगर उतारावर वृक्ष तोडण्यास मज्जाव करण्यात यावा, पावसाळ्यापूर्वी डोंगर उतारवर सैल झालेले दगड हटवण्यात यावेत. डोंगर उतारावरील पाण्याचा निचरा वेगाने व्हावा यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, आणि दरड रोधक भिंतीची उभारणी करण्यात यावी.

## ट्रक अपघातात एक ठार

हाजीअन्सार अन्सारी या क्लिनरचा मृत्यू झाला तर चालकासह दोन जण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी जखमींना रुग्णवाहिकेतून कळंब प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचारासाठी नेले तर अधिक उपचारासाठी पनवेल रुग्णालयात हलविण्यात आले. घटनास्थळी नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांची पोलीस टीम दाखल झाली होती. मृत व्यक्तीचा मृतदेह हा देखील शवविच्छेदन करण्यासाठी कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आला.

# जाहीर आवाहन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १९५ नुसार, अलिबाग शहरांतील खालीलप्रमाणे नमुद मालमत्ता धारकांस आवाहन करणेत येते की, आपली इमारत किंवा इतर संरचना किंवा अशा इमारतीवर किंवा संरचनेवर बसविलेली कोणतीही वास्तू भग्नावस्थेत असेल किंवा पडण्याचा संभव असेल अशा अतिधोकादायक वास्तू, इमारत किंवा संरचना या नगरपरिषदेकडून देण्यात आलेल्या निर्देशानुसार स्वस्तरावर निष्कासित करण्यात याव्यात तसेच नगरपरिषदेने बजावलेल्या नोटीशीनुसार धोकादायक वास्तू, इमारत किंवा संरचना यांची मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनियर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे. व या ऑडीट अहवालानुसार वास्तू, इमारत किंवा संरचना यांची मजबुती/दुरूस्ती करून घ्यावी. तसेच मजबुती/दुरूस्ती शक्य नसल्यास अशा प्रकारच्या भग्नावस्थेतील वास्तूत कोणीही वास्तव्य करू नये. सदर इमारतीमधील रहिवाश्यांनी इतत्र सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत व्हावे. तथापि या उपरही कोणी वास्तव्यास राहिल्यास व त्यामुळे कोणतीही जीवीत वा वित्तहानी झाल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

उक्त नियमानुसार यापूर्वी या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या नोटीसा आजमितीस व यापुढेही अंमलात राहतील.

धोकादायक इमारतींची माहिती :-

| अ.क्र. | म्यु.घर क्र. /स.नं./सि.स.नं. | ठिकाण | घर मालकाचे नाव | भोगवटादाराचे नाव | धोकादायक/अतिधोकादायक |
|---|---|---|---|---|---|
| १ | म्यु. घर क्र.३९५ | सन्मान हॉटेलचे बाजूला, अलिबाग | श्रीमती शारदा द्वारकानाथ राऊत वै. १२ | i.श्री. दिलीप देवळेकर<br>ii.श्री. विजय करमरकर<br>iii.श्री. हरकचंद्र हिम्मतमलजैन<br>iv.श्री. आत्माराम प्रधान<br>v.श्री. वसंतराव देशपांडे | अतिधोकादायक |
| २ | म्यु. घर क्र. ३७१ | शिवलकर नाका, डेव्हीड सोडा फॅक्ट्रीचे बाजूला | मे.पी.पी. कन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रा. श्री. प्रवीण रघुनाथ राऊत | श्री. सतिश कोचरेकर | अतिधोकादायक |
| ३ | म्यु.घ.क्र. २५८ | अलिबाग-कोळीवाडा | श्री. महेंद्र लक्ष्मण वरसोलकर वै. १८ | ... | अतिधोकादायक |
| ४ | | बंदर विभाग | मा. सहा. आयुक्त, सीमा शुल्क आयुक्तालय (प्रतिबंधक), अलिबाग कस्टम हाऊस, मांडवी मोहल्ला कोळीवाडा, अलिबाग | .. | अतिधोकादायक |
| ५ | म्यु.घर.क्र. ३८ | खोजणी नाका | श्री. रामलती राजाराम परदेशी | ... | अतिधोकादायक |
| ६ | म्यु.घर.क्र. ३७ | खोजणी नाका | श्री. रामलती राजाराम परदेशी भाडोत्री- श्री. मुकुंद गंगाराम जोशी | श्री. मुकुंद गंगाराम जोशी | अतिधोकादायक |
| ७ | म्यु.घर.क्र. ८८६ | खोजणी नाका | श्रीमती नाझमीन सरवर सैय्यद | ... | अतिधोकादायक |
| ८ | म्यु.घर.क्र. ८७८ | बाजारपेठ | मे. आनंदी एंटरप्रायझेस तर्फे श्री. दिपक कमळाकर पाटील | श्री. गुरूदास सिंघी | अतिधोकादायक |
| ९ | म्यु.घर.क्र. २२ | बाजारपेठ | श्री. रमेश रघुनाथ गव्हाणकर व श्री. उमेश रघुनाथ गव्हाणकर | ... | अतिधोकादायक |
| १० | म्यु.घर.क्र. ८५५/१ | बाजारपेठ, अलिबाग | श्रीमती हंसा शरद शेठ व श्री. रजनीकांत रामदास शेठ | सहाय्यक नियंत्रक, वैद्यक वजनमापे कार्यालय, अलिबाग-रायगड | अतिधोकादायक |
| ११ | म्यु.घर.क्र. ९२९ | बाजारपेठ | मे. म्हात्रे एन्टरप्रायझेसचे भागीदार श्री. नितीन सूर्यकांत म्हात्रे | श्री. चंदूशेठ मेहता | अतिधोकादायक |
| १२ | म्यु.घर.क्र. ९२८/अ | मिरची गल्ली, अलिबाग | श्री. इक्बाल अब्दुल लतिफ मेमन | ... | धोकादायक |
| १३ | म्यु.घर.क्र. ९३४ | बाजारपेठ, अलिबाग | श्रीमती हर्षा हरिकिसनदास श्रॉफ | ... | अतिधोकादायक |
| १४ | म्यु.घर.क्र. ९३९ | बाजारपेठ, अलिबाग | श्री. सुभाष सुरेंद्र हेंद्रे | i.श्री. पारसनीस<br>ii.श्री. घारू<br>iii. रफीक घट्टे स्टोअर्स<br>iv.श्री. असराणी | धोकादायक |
| १५ | म्यु.घर.क्र. ९७६ | बाजारपेठ | श्री. अनंत रामचंद्र घारपुरे | मे. मेहता स्टोअर्स | अतिधोकादायक |
| १६ | म्यु.घर.क्र. ९७३ | बाजारपेठ | डॉ. प्रभाकर गंगाराम देशमुख | ... | अतिधोकादायक |
| १७ | म्यु.घर.क्र. ८३९ | जुनी पोस्टाची गल्ली, अलिबाग | श्री. भालचंद्र बाबुलनाथ शेट्ये | ... | अतिधोकादायक |
| १८ | म्यु.घर.क्र. ८४३ | घोलकर वाडी | श्री. आझाद मधुसूदन घोलकर | ... | अतिधोकादायक |
| १९ | - | बाजारपेठ | ओम साई अपार्टमेंट | ... | धोकादायक |
| २० | म्यु.घर क्र. १२७४ | बालाजी नाका, अलिबाग | श्रीमती शांताबाई गंगाराम पाटील | श्री. रघुनाथ दादोजी पाटील | अतिधोकादायक |
| २१ | म्यु.घर.क्र. १२७९ | बालाजी नाका | श्रीमती सुनिता दामोदर सुर्जन | ... | अतिधोकादायक |
| २२ | मु.घर.क्र. १२८० | बालाजी नाका | श्रीमती सुनिता दामोदर सुर्जन वगैरे | i.श्री. के.आर. मोकल<br>ii.श्रीम. शिला गोळे | अतिधोकादायक |
| २३ | मु.घर.क्र. १३१३ | पागाची चाळ, अलिबाग | श्री. गंगाधर नारायण बिवलकर वै. ३ | i.श्री. उदय म्हात्रे<br>ii.श्री. बांबरकर<br>iii. श्री. कोटीयन<br>iv.श्रीमती जयवंती राऊत<br>v.श्री. पडवळ<br>vi.श्री. माने<br>vii.श्री. लोहार<br>viii.श्री. बाळकृष्ण म्हात्रे<br>ix श्री. भाऊ पाटील | अतिधोकादायक |
| २४ | म्यु.घर.क्र. १३९७ | आंग्रेवाडा | श्री. रघुजीराजे शहाजीराव आंग्रे | ... | अतिधोकादायक |
| २५ | म्यु.घर.क्र. १३९६ | आंग्रेवाडा | श्री. रघुजीराजे शहाजीराव आंग्रे | i.श्री. श्रीराम कपूर मेस्त्री<br>ii.श्री. विजय सावंत | अतिधोकादायक |
| २६ | म्यु.घर.क्र. १२६० | मारूती नाका, अलिबाग | मागेन अबोध प्रार्थना मंदिर यांचे सुवर्ण ज्युबिली हॉलिडे होम ट्रस्टी एलिझर वाकरूळकर वगैरे मारूती नाका, अलिबाग | i.श्री. अशोक नारायण पाटील<br>ii.श्रीमती आयरीन आवासकर | धोकादायक |
| २७ | | पोस्ट ऑफिस | मा. प्रबंधक पोस्ट ऑफिस अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड | ... | अतिधोकादायक |
| २८ | स.नं. १४३, सि.स.नं.७३८/१अ वै | लब्बैक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., | प्राधिकृत अधिकारी, लब्बैक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या; अलिबाग | ... | धोकादायक |
| २९ | सि.स.नं. ५४१ अे, ५१४ बी वै. | समृद्धी को.ऑप. हौसिंग सोसायटी घरतआळी, अलिबाग-रायगड | मे. समृद्धी बिल्डर्सचे भागीदार श्री. प्रसाद अनंत जोग व इतर ४ | ... | धोकादायक |
| ३० | सि.स.नं. ११५२ अे, ११५२ के, ११५२/१ ते ५, ११५२ बी | जोशीज् शारदा को. ऑप. हौसिंग सोसायटी अलिबाग-रायगड | मे. अध्यक्ष, जोशीज् शारदा को. ऑप हौसिंग सोसायटी | ... | धोकादायक |
| ३१ | स.नं. १४ भू-क्र. ४८ | ओम सहकारी गृह निर्माण संस्था मर्या. रायवाडी, अलिबाग | अध्यक्ष, ओम सहकारी गृह निर्माण संस्था रायवाडी, अलिबाग | ... | अतिधोकादायक |
| ३२ | | तलाठी सजा अलिबाग यांचे कार्यालयाचे मागील बाजूस | मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग-रायगड | ... | अतिधोकादायक |
| ३३ | | राज्य उत्पादन शुल्क कार्यालय | अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, रायगड-अलिबाग | ... | धोकादायक |
| ३४ | सि.स.नं. १०९० बी | रामनाथ, अलिबाग | चेअरमन, नवनाथ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, रामनाथ, अलिबाग | ... | धोकादायक |
| ३५ | सि.स.नं. ८९२ अे, ८९२ बी, ८९२ सी, ८९२ डी, ८९२ ई, ८९२/१ | बालाजी नाका, अलिबाग | अध्यक्ष, स्वामी समर्थ सह. गृह संस्था मर्या; सहकारी सोसायटी, बालाजी नाका अलिबाग | ... | धोकादायक |
| ३६ | म्यु.घर.क्र. १२९५ | बालाजी नाका, अलिबाग | श्री. चिंतामण वामन जोशी | बँक ऑफ इंडिया, रिजनल कार्यालय | धोकादायक |
| ३७ | सि.स.नं. ५९४/१ | बाजारपेठ, अलिबाग | अध्यक्ष, गुजराती महाजन हॉल | ... | अतिधोकादायक |
| ३८ | सि.स.नं. ९३०, ९३०/१, ९३०/२ ९३०/३, ९३०/४, ९३०/५, ९३०/५ अे, ९३०/५ बी, ९३१ ९३१/१ | मयुर बेकरी मागे, अलिबाग | अध्यक्ष, श्रीकार गृहनिर्माण हौसिंग सोसायटी | ... | धोकादायक |
| ३९ | सि.स.नं. ७१४, ७१४/१, के ७१४/७१५, म्यु. घर क्र. १५१७ (नवीन क्र. Z१MKT००१७८८) | मयुर बेकरी मागे, अलिबाग | श्री. प्रभाकर कुंटे | i.क्षेत्रीय प्रबंधक, बँक ऑफ इंडिया अलिबाग,<br>ii.श्री. हांडूर खुबान कोळी<br>iii.श्री. एस.जी. भोसले<br>iv.श्री.पी.एस. होरा<br>v.श्री.आनंदराव जुजारे<br>vi.श्री.अजित रहाणे | धोकादायक |
| ४० | सि.स.नं. १११२ अे, ११२२/१, १११२ ब | ब्राह्मण आळी, अलिबाग | अध्यक्ष शिवम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ब्राह्मण आळी, अलिबाग | ... | धोकादायक |
| ४१ | म्यु.घर.क्र. १७३ अ क बंदर (नवीन क्र. ALB००००३३१४) | शास्त्रीनगर, अलिबाग | श्री. ज्ञानेश्वर जानु तांडेल व सौ. पुष्पा ज्ञानेश्वर तांडेल | ... | अतिधोकादायक |
| ४२ | सि.स.नं. १२०२ बी, १२०२ सी, १२०२ के. म्यु.घर क्र. १७०२ (नवीन क्र. Z१CLO००२०३९) | जिल्हा न्यायालयासमोर, अलिबाग | श्री. भुपिंदर बलवंत सिंग व सौ. हरप्रितकौर भुपिंदर सिंग | ... | अतिधोकादायक |
| ४३ | | जिल्हा परिषदेची प्रशाकीय मुख्य इमारत | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग | ... | अतिधोकादायक |
| ४४ | | जिल्हा सामान्य रूग्णालयाची मुख्य इमारत | मा. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, अलिबाग | ... | अतिधोकादायक |

सही/-
**मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद**




● शिवरायांनी बांधलेले पद्मदुर्ग किल्ला आज दुरावस्थेत आहे. गडाचे बुरुज लाटांच्या माऱ्यांनी उध्वस्त झालेत. उरलेला गड वाचवण्यासाठी अनेक शिवप्रेमी संस्था प्रयत्न करीत आहे. अजून यश येत नाही. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# साळाव पुलाचे काम संथगतीने

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

अलिबाग - मुरूड मार्गावरील रेवदंडा साळाव पुल जीर्ण झाल्याने त्याची दुरुस्ती गेल्या अनेक महिन्यांपासून सुरु आहे. त्यासाठी करोडो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पावसाळा सुरू होण्यासाठी पंधरा दिवस शिल्लक राहिले आहेत.मात्र अद्यापही पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला गती मिळाली नाही. त्यामुळे दुरुस्तीचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी तीन महिने वाट पहावी लागणार असल्याचे समोर आले आहे.

अलिबाग - मुरूड व रोहा या तीन तालुक्यांना जोडणारा साळाव येथील पुल ३६ वर्षांहून अधिक जूना आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांच्या पुढाकाराने हा पुल उभारण्यात आला होता. रेवदंडा - साळाव पूलाचे काम १९८६ मध्ये करण्यात आले. या पुलाची लांबी ५१० मीटर इतकी आहे. या पुलाला बारा गाळे आहेत. या पुलामुळे तीन तालुके जवळ आली. मुरूड, काशीद येथील पर्यटनाला चालना मिळाली. मात्र रेवदंडा - साळाव पुल जीर्ण झाले होते. त्यांच्या भिंतीना तडे पडले होते. त्यामुळे या पुलाची दुरुस्ती, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी सुमारे दहा कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या पुलाच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले. गेल्या अनेक महिन्यांपासून डागडूजी, दुरुस्तीचे काम सुरु आहे. पावसाळा सुरु होण्यास काहीच दिवस शिल्लक राहिले आहेत. तरीदेखील या पुलाच्या दुरुस्तीचे काम अद्यापपर्यंत पुर्ण झाले नाही. संथ गतीने सुरु असलेल्या कामामुळे वाहनांना वाहतूकीला अडथळा निर्माण होत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुखदेवे यांच्या संपर्क साधला, मात्र तो होऊशकला नाही.



### अजून तीन महिने प्रतिक्षा

पुलाच्या दुरुस्तीच्या कामाबाबत तेथील कामगारांशी संवाद साधला, असता अजून काम पुर्ण होण्यास तीन महिने लागण्याची शक्यता आहे. सध्या पुलाच्या वरचा काम सुरु आहे. वाहने धावताना पुलावर त्याचा ताण पडू नये यासाठी दुरुस्तीचे काम सुरु आहे. हे काम पुर्ण होण्यास पंधरा दिवस लागणार आहेत. पुलाच्या खालील भागाचे काम पंधरा दिवसानंतर सुरु केले जाणार आहे. त्यामुळे अजून तीन महिने वाट पहावी लागणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या कामाबाबत प्रवासी वर्गाकडून नाराजीचे सुर उमटत आहेत.

### अधिकच झाला होता कमकूवत

जुन्या असलेल्या या पुलाला मालवाहू बाजची धडक लागली होती. या धडकेने पुल अधिकच कमकुवत झाला होता. रेवदंडा साळाव पुल धोकादायक स्थितीत असल्याचे स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये दिसून आले. त्यामध्ये ११ खांबापैकी मधला चार खांब नाजूक स्थितीत होते, त्यामुळे या पुलाच्या तातडीने दुरुस्ती सुरु केली. सावित्री पुल दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली. पाण्याखालील दुरुस्ती, एक्स्पांशन जॉईनींगचे काम अद्याप शिल्लक आहे.

# अवकाळीनं सारंच ओरबाडलं

## शेतकऱ्यांचं अवसानच गळालं

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

राज्यातील बहुतांश भागात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावत एकच दाणादाण उडवली आहे. या अवकाळी पावसासह, सोसाट्याच्या वादळी वाऱ्याचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसला आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आधीच कंबरडे मोडले असताना दुष्काळात तारलेली पिके वादळी वाऱ्याने ओरबाडून नेली आहेत. दोन दिवसापूर्वी इंदापूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह दमदार पाऊस झाला. त्यामुळे त्यात शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झालं आहे.

दोन दिवसांपूर्वी रायगड जिल्ह्यात जोरदार वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस पडला. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची आणि नागरिकांची तारांबळ उडाली आहे. अवकाळी पावसामुळे मात्र आंबा बागायतदार, केळी उत्पादक, जांभूळ पीक घेणारे शेतकरी चिंतेत आहेत. रायगडमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाला आहे. रायगडच्या महाड, माणगाव, पोलादपूर, म्हसळा श्रीवर्धन भागात अवकाळी पाऊस पडला. काही परिसरात गारांचा पाऊस कोसळला.

या अवकाळी पावसाचा सर्वाधिक आंबा, केळी उत्पादकांना बसला. अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या केळी बागांसह लहान बाग देखील जमिनीवर अक्षरक्ष: आडव्या झाल्या. हाता-तोंडाशी आलेला घास अवकाळीने हिरावून घेतल्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे अवसानच गळालं असल्याचे चित्र सध्या शेतकऱ्यांमध्ये बघायला मिळत आहे.

# पोलिसांचा सागर कवच अंतर्गत बंदोबस्त

## सागरी सुरक्षेसाठी ६०० हून अधिक अधिकारी, २२,२३ मे रोजी राहणार गस्त

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जिल्हा पोलिसांकडून सागरी सुरक्षेच्या दृष्टीने सागर कवच अभियान राबवण्यात येते. जिल्ह्यात सागरी सुरक्षा भक्कम राहावी यासाठी २२ आणि २३ मे रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत सागर सुरक्षा कवच राबवण्यात येणार आहे. यासाठी सागरी किनारी भागात तपासणी नाके तयार करून पोलिसांकडून संशयित असलेली वाहने तपासली जातील.

या मोहिमेत जिल्ह्यातील पोलीस आणि सागरी तटरक्षक दलाचे सहाशेपेक्षा अधिक अधिकारी, कर्मचारी सहभागी होत आहेत. पोलीस विभाग व्यतिरिक्त महाराष्ट्र मेरीटाइम, मत्स्य व्यवसाय, सुरक्षा मंडळ, भारतीय तटरक्षक दल, सीमा शुल्क विभाग, सागर सुरक्षा दलाचे सदस्य हेदेखील सागर सुरक्षा कवच अभियानात सहभागी होणार आहेत. हे अभियान २२ मे रोजी सुरू होऊन २३ मे रोजी सायंकाळी ६ वाजता संपणार आहे.

सागर सुरक्षा कवच अभियानात सहभागी होण्यासाठी ८४ पोलीस अधिकारी आणि ५१९ पोलीस कर्मचारी सज्ज झाले आहेत. सागरी पोलीस ठाण्यांमार्फत जिल्ह्यातील समुद्रकिनारी होणाऱ्या संशयित हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जाते. जिल्ह्यातील सागरी सुरक्षा अधिक मजबूत ठेवण्यासाठी, तसेच दहशतवादी हल्ल्यांपासून सतर्क राहण्यासाठी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सागरी सुरक्षा कवच अभियान सुरू करण्यात आले आहे. सागरी मार्गाबरोबरच रस्त्याने येणाऱ्या अनोळखी व्यक्तींवरही नजर ठेवली जाणार आहे.

या अभियानासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, महिला विभाग, बॉम्बशोधक पथक, गुन्हे शाखा, सायबर सेल अशा विविध खात्यांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची राखीव पोलीस म्हणून नियुक्ती केली आहे.

मार्च १९९२ मध्ये मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोट हल्ल्यात वापरलेले आरडीएक्स हे रायगडमधील शेखाडीमार्गे नेण्यात आले होते. त्यानंतर जिल्ह्यातील सागरी सुरक्षा धोक्यात आली होती. त्यामुळे समुद्रमार्गे अथवा किनारी रस्त्याने दहशतवादी कारवाईवर नजर ठेवण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात सागरी पोलीस ठाणे बनवण्यात आली. जिल्ह्यात मांडवा, दिघी, दादर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर मुरुड, बोर्ली या ठिकाणी सागरी पोलीस ठाणे आहेत. सागर सुरक्षा कवच अभियान दर सहा महिन्यांनी जिल्हा पोलीस दलाकडून राबवण्यात येते. सागरी किनारी भागात चेकपोस्ट तयार करून येणाऱ्या जाणाऱ्या संशयित वाहनांची तपासणी पोलिसांकडून केली जाते.

# रायगड विश्वजननी बँकेला टाळे

## खोपोली, खालापूरातील खातेदारांचे पैसे बुडाल्याने खळबळ

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

खोपोली शहरात आरिहांत टॉवर डी येथे एका गाळ्यात रायगड विश्वजननी भारत निधी अर्बन बँकेचे कार्यालय सुरू केले होते. छोटे-मोठे दुकानदारांनी दररोजची रक्कम गोळा करण्यासाठी बँकेमार्फत एजंट नेमून खालापूर तालुक्यात व खोपोली शहरात बँकेची जाहिरात करून या बँकेचे मुख्य ऑफिस कर्जत शेळू येथे असल्याचे ग्राहकांना सांगितले होते. त्यामुळे अनेक दैनंदिन बचत खाते काढून त्यात रोजची रक्कम वसुली केली. वर्षभरात एक रकमी व्याजासह रक्कम मिळेल, या आशेवर असणाऱ्या ग्राहकांना बँक बंद झाल्याची माहिती मिळताच मोठा धक्काच बसला. अनेक ग्राहक चौकशीसाठी बँकेत गेले, परंतू बँकेला टाळे असल्याने अनेक महिला ग्राहकांनी आरडाओरडा केला. त्याच वेळेस दररोज दैनंदिन रक्कम घेण्यासाठी येणारे एजंट यांना बोलविण्यात आले. त्यांना ८ एप्रिलला अचानक बँकेला टाळे असल्याचे माहिती मिळाली. एजंट लोकांचे काम केलेले पगारही दिले नसल्याचे ग्राहकांना सांगितले.

त्यांनतर बँकेचे मॅनेजर मल्लारी सूर्यवंशी यांना दूरध्वनी मार्फत संपर्क करण्याचा प्रयत्न केला, असता कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अनेक ग्राहक आर्थिक अडचणीत आले आहेत.

**खोपोली, खालापूर परिसरातील अनेकांनी आपल्या आयुष्यभराची जमापुंजी बँकेत जमा केली होती. मात्र अचानक बँकेला लागलेले टाळे पाहून त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. या घटनेमुळे अनेकांनी बँक अधिकाऱ्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र शोध लागला नाही.**

परिणामी, बँकेच्या व्यवस्थापनावर कडक कारवाई व्हावी, यासाठी खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला आहे.

या तक्रारीत आमचे पैसे मिळून द्यावे, अशी मागणी करण्यात आली असून याबाबत चौकशी सुरू आहे. लवकरच दोषींवर कारवाई होईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी दिली आहे. मात्र या बँकेचे व्यवस्थापन अधिकारी मल्लारी सर्यवंशी यांच्याशी दूरध्वनी मार्फत प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद दिला नाही.

# अपघातात तरुणाचा मृत्यू

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

अज्ञात वाहनाने भरधाव वेगाने वाहन चालवून २५ वर्षीय मुकीम अन्सारी या पादचाऱ्याला धडक दिली. यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

मुकीम अहमद अन्सारी हा मच्छी मार्केट जवळ खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे राहत असून तो मूळचा उत्तर प्रदेश येथील आहे. तो शोरमा सेंटरवर काम करतो. १९ मे रोजी साडेपाच ते सातच्या दरम्यान तो स्टील मार्केट येथे पायी फिरण्यास गेला होता. त्यावेळी अज्ञात वाहनाने त्याला ठोकर मारून अपघात केला.

# कर्नाळा-फळशेत रस्त्याच्या कामाला सुरुवात

। तळा । प्रतिनिधी ।

तळा तालुक्यातील कर्नाळा-फळशेत गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरू झाल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. तळा तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर कर्नाळा-फळशेत गावासाठी तळा हे तालुक्याचे मुख्य ठिकाण झाले. पुर्वी माणगाव तालुका होता. त्या दृष्टीने निगुडशेत मार्गे तालुक्याच्या माणगाव या ठिकाणी जाणे सोपे होते. मात्र तळा तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर हा रस्ता येथील नागरिकांना दूरवरचा झाला. मात्र कर्नाळा-फळशेत हा रस्ता जवळचा व सोईचा होत आहे.

रस्त्याअभावी तळा ते आनंदवाडी व तेथून पुढे या गावांतील नागरिकांना या डोंगराळ भागातून चालत जावे लागत होते. तसेच याच मार्गांनी या गावांतील विद्यार्थी आठवी ते पुढील शिक्षणासाठी नियमित प्रवास करत होत. या रस्त्याचे काम सुरु झाल्यामुळे शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची पायपीट थाबली आहे. आता अनेक समस्या या रस्त्यामुळे नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या सुटणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.



■ वेळेसह पैशांचा अपव्यय टळला
■ विद्यार्थी, रुग्णांनी मानले आभार

# विक्रेते, गुणनियंत्रण निरीक्षकांची कार्यशाळा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

खरीपहंगाम २०२४पूर्वतयारीसाठी जिल्ह्यातील सर्व निविष्ठा विक्रेते, कंपनी प्रतिनिधी व गुणनियंत्रक निरिक्षक यांची कार्यशाळा प्रशिक्षण (दि.१६) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,रायगड यांच्या अध्यक्षतेखाली व कृषि विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

जिल्ह्यातील सर्व निविष्ठा विक्रेत्यांनी विक्री केंद्रावर अद्ययावत परवाना, निविष्ठांचे दरपत्रक व टोल फ्री क्रमांक दर्शनीभागात लावण्यात यावा तसेच निविष्ठांची विक्री करताना शेतकऱ्यांना विहीत नमुन्यात पावती देण्यात यावी याबाबत सूचना दिल्या. शेतकऱ्यांना अनुदानीत रासायनिक खतांची विक्री करताना पॉस मशिनव्दारेच विक्री करावी. बियाणे खते व किटकनाशके योग्य गुणवत्तेची व मागणीप्रमाणे वेळेत पुरवठा करण्याबाबत संबंधित उत्पादक कंपन्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच युरिया ब्रिकेट, नॅनो युरिया, नॅनो डिएपी खतांचा वापर वाढविण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करुन प्रसिध्दी देणेत यावी. किटकनाशके फवारणी करताना सुरक्षा किटचा वापर करणे बाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे.

जिल्हयात तालुक्यात भरारी पथकांची स्थापना केली असून या पथकामार्फत तपासणी करुन विक्रेत्यांकडील अनियमितेबाबत उदा. निविष्ठांची शेतकऱ्यांना पक्की पावती न देणे, जादा दराने विक्री करणे, रेकॉर्ड अद्ययावत नसणे, योग्य गुणवत्तेच्या निविष्ठा विक्रीस न ठेवणे इत्यादी कारणामुळे संबंधित विक्रेत्याचा परवाना रद्द करुन कायदेशीर कठोर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना चांगल्या प्रतिचे व योग्य गुणवत्तेचे योग्य दरात कृषी निविष्ठा उपलब्ध करुन देवून हा खरीप हंगाम यशस्वी करण्याबाबत निविष्ठा उत्पादक कंपनी व विक्रेत्यांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आवाहन केले.

कृषि विकास अधिकारी मिलिंद चौधरी यांनी उपस्थित सर्वाचे स्वागत करून सभा व प्रशिक्षणाचा उददेश या बाबत सविस्तर प्रस्तावित केले. शेवटी कृषि अधिकारी महामुणी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# पुई गावाने साधला सर्वांगीण विकास | सलग दुसऱ्या वर्षी स्वप्नातील गावाचा दर्जा

### स्वदेस फाऊंडेशनमार्फत मिळाला किताब

। सुधागड/पाली । प्रतिनिधी ।

स्वदेस फाऊंडेशनने गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व गावाच्या विकासासाठी लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी स्वप्नातील गाव या स्पर्धेचे आयोजन केलेले होते. सुधागड तालुक्यातील पुई गावाने सर्वांगीण विकासाच्या कामांमध्ये सातत्य ठेवले असून गुणवत्तासुद्धा अबाधित ठेवली आहे. तसेच काही नवीन कामांची त्यामध्ये भर टाकली आहे. त्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून पुई या गावाला स्वप्नातील गावाचा किताब देण्यात आला.




● पाली, स्वप्नातील गावचा किताब स्विकारताना पुई ग्रामस्थ व स्वदेस फाऊंडेशनचे पदाधिकारी. (छायाचित्र : गौसखान पठाण)

स्वदेस फाऊंडेशनचे संस्थापक रॉनी स्क्रूवाला आणि झरीना स्क्रूवाला तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे व संचालक प्रदीप साठे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये अनेक विकासात्मक अशी वेगवेगळी कामे होत आहेत.

गावाचा विकास करण्यासाठी आणि गाव स्वप्नपूर्ण बनवण्यासाठी गाव विकास समितीचे अध्यक्ष आणि सर्व सदस्य यांची विशेष मेहनत आहे. त्याचबरोबर गावातील युवक आणि महिला यांचे योगदान सुद्धा खूप महत्त्वाचे आहे. पुई या गावाने अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करून सुधागड तालुक्यामध्ये एक नवीन आदर्श उभा केलेला आहे.

या कार्यक्रमासाठी स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच स्वदेस फाऊंडेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक शिवदास वायाळ वरिष्ठ समन्वयक श्रीधर कोकरे, ग्रामविकास समितीचे अध्यक्ष निलेश शिर्के आणि कमिटीचे इतर सर्व सदस्य उपस्थित होते. तसेच गावातील युवक, प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ नागरिक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शंभर टक्के पक्की घरे

पुई गावाने एकत्रितपणे पुढे येऊन गाव विकासासाठी खूप कामे केली आहेत. या गावांमध्ये शंभर टक्के घरे पक्की आहेत. गावामध्ये अंतर्गत पक्का रस्ता आहे. सर्व घरे रंगीत एकाच कलरची आहेत. सर्वांकडे शौचालय, पिण्याचे शुद्ध पाणी, सर्व कुटुंबांचा आरोग्य विमा, सर्व कुटुंबाच्या हाताला काम आहे. पात्र लाभार्थ्यांना पेन्शन योजना मिळत आहेत. गावामध्ये प्लास्टिकचे व्यवस्थापन केले जात आहे. ओल्या व सुक्या कचऱ्याचे व्यवस्थापन केले जात आहे. अशी अनेक विकासाची काम या गावांमध्ये झाली आहेत. त्यामुळेच या गावाला स्वप्नातील गावाचा दर्जा मिळाला आहे.

# वीस लाखांची फसवणूक

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास भरपूर नफा मिळेल, असे आमिष दाखवून ३४ वर्षीय महिलेची २० लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी नेहा मालवीया, समीर कामदार, जॉन हसमन, हर्षिता, अहान आणि अभिनव या सहा जणांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ३४ वर्षीय महिला अरिहंत अर्हम, कोप्रोली येथे राहत असून तिला फेसबुकवर एक जाहिरात दिसली. त्यावर शेअर मार्केटमध्ये इन्व्हेस्टमेंट करण्याबाबत माहिती दिली होती. तसचे त्यात कमी गुंतवणूकीमध्ये जास्त रक्कम मिळण्याबाबतची जाहिरात होती. त्यांनी त्या लिंकवर क्लिक केले असता ग्रुप जॉईन केले. त्यानंतर त्यांचा मोबाईल क्रमांक व आधारकार्डची तपासणी झाली. २२ फेब्रुवारी ते मे पर्यंत नेहा मालवीया, समीर कामदार, जॉन हसमन, हर्षिता, अहम आणि अभिनव यांनी संगनमताने बनावट कंपनीच्या नावाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून भरपूर नफा मिळवण्याची जाहिरात केली आणि व्हाट्सअप ग्रुपमध्ये त्यांना समाविष्ट करुन घेतले. तसेच ऑनलाइन अँड बँकिंग द्वारे २० लाख ५० हजार रुपये घेऊन ऑनलाईन शेअर मार्केटच्या बहाण्याने फसवणूक केली.

www.krushival.in
गुरूवार, दि. २३ मे, २०२४
कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# या देशात हेही घडते

भारत हा एक अफलातून देश आहे. एकीकडे या देशात वीट येईल असे राजकारण चालू असते. बेफाम गाडी चालवून लोकांचे खून करणाऱ्यांना जामीन मिळतात. सरकारी यंत्रणा म्हणजे तर बेपर्वाई आणि भ्रष्टाचाराचा अर्क असल्यासारख्या वागत असतात. तरीही या सर्वांच्या पलिकडे काही व्यक्ती, संस्था शांतपणे आपले काम करीत असतात. त्यांच्यासाठी उभारलेल्या व्यवस्था नेकपणे चालू असतात. त्यातून मग अद्भुत वाटावेत असे चमत्कार घडतात. जपानमधील कोबे येथे सोमवारी असेच काहीसे घडले. तेथे अपंगाच्या मैदानी खेळांच्या जागतिक विजेतेपद स्पर्धा चालू आहेत. त्यामध्ये चारशे मीटर धावण्याच्या शर्यतीत भारताच्या दीप्ती जीवनजी हिने सुवर्णपदक मिळवले. इतकेच नाही तर तिने ५५.०७ सेकंदांची वेळ नोंदवून नवा जागतिक विक्रम नोंदवला. आधीचा ५५.१२ सेकंदांचा विक्रम अमेरिकी खेळाडूच्या नावावर होता. सर्वसामान्य, म्हणजे अपंग नसलेल्या महिलांचा चारशे मीटरचा जागतिक विक्रम सध्या ४७.६० सेकंद इतका आहे. म्हणजे दीप्ती त्या विक्रमापासून केवळ आठ सेकंदच दूर आहे. दीप्तीने यापूर्वी २०२३ च्या आशियाई स्पर्धेतही सुवर्णपदक मिळवले होते. त्यामुळे तिच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष होते. तिनेही निराशा केली नाही. भारताला आतापर्यंत या स्पर्धेत चार सुवर्णपदके मिळाली आहेत. पदके मिळालेल्या व न मिळालेल्या या सर्वच खेळाडूंची कहाणी प्रेरणादायी आहे. पण दीप्तीची कहाणी विशेष लक्षवेधक आहे. दीप्ती ही जीवनजी यादगिरी आणि जीवनजी धनलक्ष्मी या शेतमजूर जोडप्याची मुलगी. ती झाली तेव्हा तिचे डोके खूप लहान होते व नाक आणि ओठ वाकडेतिकडे होते. त्यामुळे तिला गावातले लोक मेंटल किंवा माकड असे म्हणत. या मुलीला अनाथाश्रमात टाकून द्या असे नातेवाईक सतत सांगत. दीप्ती थोडी मोठी झाल्यावर ती गतिमंद आहे व तिला नीट बोलता येत नाही हे आईवडिलांच्या लक्षात आले. तरीही आपल्या परीने तिला शिकवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

### योग्य वेळी मार्गदर्शन

तेलंगणमधील वरंगळ परिसरातील पाच हजार वस्तीच्या खेड्यात जीवनजी परिवार राहतो. गरिबी इतकी की हातात असलेली अर्धा एकर जमीनही त्यांना विकावी लागली. त्यानंतर शंभर किंवा दीडशे रुपये रोजावर शेतमजूर म्हणून काम करीत त्यांनी निर्वाह केला. त्यात दीप्तीसारखी मुलगी पदरात असल्याने आणखी चिंता होती. दीप्तीला शाळेतील मुले सतत चिडवत. मग ती रडत रडत नेहमी घरी येई. मात्र तिच्यात एक गोष्ट वेगळी होती. ती पळण्यात लहानपणापासूनच खूप जबर होती व धडधाकट मुलांनाही मागे टाकत असे. २०१० मध्ये हीच गोष्ट पीटीचे कोच असलेले बियाणी वेंकटेश्वरुलू यांच्या लक्षात आली. त्यांनी तिला शिकवण्याचे ठरवले. दीप्ती जोरात पळत असे. मात्र तिला आपण आपल्याच ठराविक लेनमधून पळावे लागते, इतर स्पर्धकांच्या लेनमध्ये जाऊन चालत नाही इत्यादी गोष्टी कळत नसत. राज्य स्तरावरील एका स्पर्धेत ती शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत पहिली आली. मात्र शेजारच्या स्पर्धकाच्या लेनमध्ये गेल्याने तिला पदक मिळाले नाही. त्यामुळे तिला शर्यत, तिचे नियम इत्यादी समजावणे हे पहिले मोठे काम होते. स्पर्धेसाठी योग्य रीतीने स्टार्ट घेणे, पळणे इत्यादी गोष्टी शिकवणे हे नंतरचे काम होते. पण प्रारंभीच्या गुरुंनी ते केले. यातूनच तिने राज्यातील अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन चांगले यश मिळवले. २०१९ च्या राज्य पातळीवरील स्पर्धांच्या दरम्यान, स्पोर्ट्स ऑथोरिटी ऑफ इंडियाचे कोच एन. रमेश यांचे तिच्याकडे लक्ष गेले. ते तिच्या घरी गेले व तिला प्रशिक्षणासाठी हैदराबादच्या केंद्रामध्ये पाठवावे असा आग्रह त्यांनी तिच्या आईवडिलांकडे धरला. पण परिस्थिती अशी होती की, या गावाहून हैदराबादपर्यंतचे बसचे भाडे द्यायलाही पालकांकडे पैसे नव्हते. अखेर अनेकांच्या मदतीने ती स्पोर्ट्स ऑथोरिटीच्या केंद्रात पोचली. मात्र आजवर तिने कधीच इतके मोठे स्टेडियम पाहिलेले नव्हते व तेथील स्पर्धांमध्ये भाग घेतला नव्हता. त्यामुळे ती एकदम बुजून गेली.

### संस्थांची भूमिका

त्यावेळी तिला शिकवण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. पण त्यांनी जिद्द सोडली नाही. त्यावेळी एकदा विख्यात बॅडमिंटन प्रशिक्षक पुलेला गोपीचंद यांनी तिला पाहिले. त्यांनी तिच्या प्रशिक्षकांना तिला सिकंदराबादच्या गतिमंदांसाठीच्या राष्ट्रीय संस्थेकडून तिची तपासणी करून घेण्यास सुचवले. त्यामुळेच अपंगांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पात्र होण्यासाठीची तिच्या चाचण्या वेळेत होऊ शकल्या. तिने मोरोक्को तसेच ऑस्ट्रेलियातील जागतिक स्पर्धांमध्ये यश मिळवले. गेल्या वर्षी चीनमधील हांगझाऊ येथे झालेल्या आशियाई स्पर्धेतही तिने नव्या विक्रमासहित यश मिळवले होते. त्यावर आता जपानमध्ये तिने नवा कळस चढवला आहे. दीप्तीची ही कहाणी म्हणजे तिच्या प्रशिक्षकांच्याही पराक्रमाची, चिकाटीची व मेहनतीची कहाणी आहे. चारशे मीटर धावण्याच्या शर्यतीत आजही तिचे प्रशिक्षक तिच्यासोबत धावतात व दर शंभर मीटरवर एक खुणेची शिट्टी वाजवतात. जेणेकरून स्पर्धा आणखी पुढे चालू आहे हे तिला कळावे. दीप्ती ही आज वीस वर्षांची असली तरी तिचे मानसिक वय लहानच आहे. त्यामुळे गोष्टी तिच्या समजुतीने घ्याव्या लागतात. हे करत करत ज्यांनी एक विक्रमवीर घडवली त्या प्रशिक्षकांना खरोखर सलाम करायला हवा. तिच्या आईवडीलांचीही तारीफ करायला हवी. आधीच मुलगी, त्यातही मानसिकदृष्ट्या दुर्बल म्हणून तिचा दुस्वास केला नाही. पण या प्रवासात ठळकपणे जाणवणारी आणखी एक गोष्ट म्हणजे अपंगांसाठी प्रामाणिकपणे काम करीत असलेल्या संस्था व संघटना. या बहुतांशी सरकारी आहेत व त्यांच्या वाट्याला फार प्रसिध्दी किंवा पैसा येत नाही. तरीही ते नेमस्तपणे काम करीत राहतात. याच यंत्रणेतून सर्व स्तरांवर सातत्याने स्पर्धा भरवल्या जातात व त्यातूनच आपले खेळाडू जागतिक स्तरावरही पोचतात. एकीकडे अपंगांसाठी सरकारी कार्यालये किंवा एसटी स्टँडवर सोयींची मारामार असलेल्या या देशात दुसरीकडे हेही घडते हे नोंदवायलाच हवे. दीप्ती आणि तिच्या सहकाऱ्यांना सलाम.

**विचार**

# जगाला युद्धाची नव्हे, बुद्धाची गरज!

**डॉ. श्रीमंत कोकाटे**

तथागत गौतम बुद्ध यांचा जन्म ईसपू. ५६३ साली लुम्बिनी या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राजा शुध्दोदन तर आईचे नाव महामाया होते. मातेचे सातव्या दिवशी निधन झाल्यानंतर त्यांचा सांभाळ मावशी तथा सावत्र माता गौतमीने अत्यंत प्रेमाने केला. बुद्धाचे मूळ नाव सिद्धार्थ होते. अशक्य कार्य सिद्धीस नेणारा म्हणजे सिद्धार्थ होय. तसेच त्यांना 'भगवा' या नावानेदेखील ओळखले जात असे. भगवा म्हणजे महान. भगवा हा पाली भाषेतील शब्द आहे. कारुण्य आणि प्रेम यांनी त्यांचे व्यक्तिमत्व ओतप्रोत भरले होते.



सिद्धार्थला तत्कालीन सर्व प्रकारचे शिक्षण देण्यात आले. त्यांचा विवाह यशोधरेबरोबर झाला. त्यांना राहुल नावाचा मुलगा होता. सिद्धार्थ राजपुत्र होते. ऐश्वर्य त्यांच्या पायात लोळत होते. परंतु मानवी समुदयात असणाऱ्या दुःखाने ते अस्वस्थ होते. दुःख नष्ट होऊन सर्वांना सुख मिळावे, या उदात्त हेतूने त्यांनी गृहत्याग करण्याचा निर्णय घेतला.

ऐन तारुण्यात म्हणजे तिशीत असताना त्यांनी सुंदर राजवाडा, सुंदर महाराणी, सुंदर पुत्र आणि आनंददायी जीवनाचा त्याग केला. ते कपिलवस्तूवरून राजगृह आणि नंतर गया येथे आले. तेथे ज्ञानार्जन केले. कठोर कष्ट घेतले. वेद, उपनिषद वाचली. अनेक संप्रदायाचा अभ्यास केला. त्यातील निरर्थकता त्यांनी ओळखली. त्यांना सर्वोच्च ज्ञान प्राप्त झाले. ते आता बुद्ध झाले. पण ते एकांतात थांबले नाहीत. ते लोकांत जाऊन बोध करू लागले.

बुद्ध परिक्रमा करत निघाले. त्यांनी पहिले प्रवचन वाराणशी जवळील सारनाथ येथे केले. बुद्धाने सांगितलेले तत्वज्ञान पुढीलप्रमाणे आहे. 'जीवन हे दुःखमय आहे, त्यामागे तृष्णा आहे, पण दुःखाचे निराकरण होऊ शकते, तो मार्ग म्हणजे अष्टांगिक मार्ग आहे.' पूर्वजन्म- पुनर्जन्म, कर्मविपाक या अज्ञानी बाबी नाकारून त्यांनी मानवाला आत्मविश्वास दिला. अत्यंत साध्या सोप्या लोकभाषेत म्हणजे पाली भाषेत त्यांनी बोध केला. त्यांनी वेदप्रामाण्य नाकारले. त्यांनी ऐश्वर्यसंपन्न जीवनाचा त्याग करून लोककल्याणासाठी आयुष्याची अखंड ५० वर्षे गावोगावी परिभ्रमण केले. त्यांच्या विचाराने जनसमुदाय प्रभावित झाला. अनेक राजानी बुद्धांचा विचार अंगिकारला.

बुद्ध म्हणाले, 'मी देव नाही किंवा त्याचा दूत नाही. ईश्वर आहे की नाही त्यापेक्षा माणूस आहे आणि त्याचे प्रश्न महत्वाचे आहेत, आणि ते सोडवण्याचा मार्ग आहे, तो मार्ग म्हणजेच अरिय सत्ये-अष्टांगिक मार्ग होय. दुःखी जीवनाला चमत्काराने किंवा कर्मकांडाने नव्हे, तर प्रयत्नाने सुखी बनवता येते' हा प्रयत्नवाद बुद्ध सांगतात.

बुद्ध म्हणाले, 'जिवंत माणसांचा विचार करा, स्वर्ग, नरक, पूर्वजन्म, पुनर्जन्म, आत्मा या थोतांडात अडकू नका. बुद्ध प्रतित्यसमुत्पाद सांगतात, म्हणजे सभोवताली घडणाऱ्या घटनांच्या मागे कारण आहे, चमत्कार नाही,' निसर्गात घडणाऱ्या घटनांचे शास्त्रीय विश्लेषण करणारा जगातील पहिला महामानव म्हणजे बुद्ध होय. जगातील विज्ञानाचा पाया बुद्धाने घातला. यज्ञ-होम हवनाने फलप्राप्ती होते, असे सांगणे म्हणजे एका आंधळ्याने दुसऱ्या आंधळ्याला रस्ता दाखवल्यासारखे आहे, असे बुद्ध म्हणतात. बुद्धांच्या विचारांमुळे जुलमी, शोषण करणारी यज्ञ संस्कृती खिळखिळी झाली.

कन्या जन्माने निराश झालेल्या राजा प्रसेनजीतला बुद्ध म्हणाले, 'राजा मुलगी झाली दुःख करू नकोस, मुलगी सुद्धा शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आणि बौद्धिकदृष्ट्या सामर्थ्यशाली आहे. मुलाप्रमाणेच मुलगी देखील वंशवर्धक आहे'. अडीच हजार वर्षांपूर्वी मुलींना वंशाचा दिवा मानून त्यांना स्वातंत्र्य देणारे बुद्ध होते. ज्या काळात मुलगाच जन्माला (पुत्रकामेष्टी) आला पाहिजे, असे वैदिक (ब्राम्हणी) परंपरा सांगत होती. त्या काळात बुद्ध मुलगी देखील मुलाप्रमाणेच वंशाचा दिवा आहे, असे आग्रहाने सांगत होते. त्यांनी स्त्री-पुरुष भेदभाव नाकारला. आनंदशी झालेल्या विचारमंथनातून त्यांनी महिलांना संघगनात प्रवेश दिला. त्यांना ज्ञानार्जनाचा अधिकार दिला.

बुद्ध म्हणाले 'प्राण्यात जाती आहेत (हत्ती, घोडा, बैल इ), पक्षात जाती आहेत.(चिमणी, पोपट, कावळा इ),वनस्पतीमध्ये जाती आहेत (आंबा, चिंच, नारळ इ) तशा माणसात जाती दाखवा?'. म्हणजे मानव हीच एक जात आहे. त्यामुळे माणसांनी माणसांशी विवाह करणे, हा आंतरजातीय विवाह नव्हे, तर तो एकजातीय विवाह ठरतो. मानवाने जर इतर प्राण्यांशी ( वाघ, हत्ती, घोडा, गाढव, कुत्रा इत्यादी) विवाह केला, तर तो आंतरजातीय विवाह ठरेल. सर्व माणसं समान आहेत. सर्वांचे रक्त लाल आहे, सर्वांना सारखेच अवयव आहेत, सर्वांना श्वसनासाठी ऑक्सिजनच लागतो, त्यामुळे भेदाभेद पाळणे अधर्म आहे, तर समता पाळणे धर्म आहे.

बुद्ध म्हणाले, 'माझ्या कालबाह्य नव्हे, तर कालातीत ज्ञानाचे अनुयायी व्हा' बुद्धाचे विचार कालबाह्य झाले नाहीत, तरी देखील माझे विचार कालबाह्य वाटले, तर त्याचा त्याग करा, असे सांगायला आत्मविश्वास, हिम्मत आणि प्रामाणिकपणा लागतो, तो बुद्धाकडे प्रचंड होता. त्यामुळेच नवीन तत्वज्ञानाची मांडणी करणारे अश्वघोष, नागसेन, वसुबंधु, दिग्नाग, धर्मकिर्ती, विवेकानंद, ओशो, डॉ.आंबेडकर, शरद पाटील असे महान फिलॉसॉफर निर्माण झाले.

बुद्ध म्हणाले, अत्त दीप भव म्हणजे स्वयंप्रज्ञ व्हा, स्वतः ज्ञानी व्हा आणि स्वतः ज्ञानी झालेल्या व्यक्तीला जगात कोणीही फसवू शकत नाही. आज जगात धर्माच्या नावाखाली गुलामगिरी आलेली आहे. शोषणव्यवस्था आलेली आहे. त्याला सर्वसामान्यांचे अज्ञानच कारणीभूत आहे. त्यामुळेच अनेक बुवा, बापू, आचार्य, शंकराचार्य, भोंदू बाबा, सर्वसामान्य लोकांनाच काय शिक्षित लोकांना देखील फसवत असतात. त्याचे कारण योग्य ज्ञानाची प्राप्ती न केल्यामुळे! त्यामुळे बुद्ध कालामाना म्हणाले एखादा विद्वान, सुंदर, भाषाप्रभू व्यक्ती सांगतोय म्हणून विश्वास ठेवू नका, तर सत्याच्या कसोटीवर टिकणाऱ्या विचारावर विश्वास ठेवा आणि त्यासाठी तुम्ही स्वयंप्रकाशित व्हा. म्हणजेच बुद्धाने धार्मिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजेच अत्त दीप भव हा सिद्धांत सांगितला. धर्मासाठी माणूस नाही तर माणसासाठी धर्म ही बुध्दाची भूमिका होती. त्यांनी मानवतावादी-मानवी कल्याणाचा धर्म दिला, ईश्वरी कल्याणाचा नव्हे.

बुद्धाच्या मतानुसार ब्रह्मचर्य ही संकल्पना नैसर्गिक नसून अनैसर्गिक आहे, किंबहुना निसर्गविरोधी आहे. परंतु त्यावरती नैसर्गिकरित्या अंकुश ठेवता येतो, असेही बुद्ध म्हणतात. ब्रह्मचर्याच्या नावाखाली दमन करणे, ही संस्कृती नसून ही विकृती आहे. प्रजनन हा सजीवांचा स्थायीभाव आहे. तो सृजनाशी संबंधित आहे. बुद्धाचा धम्म हा निसर्गवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आहे, त्यात विकृतीला थारा नाही. बुद्ध वैश्विक महामानव आहेत. बुद्ध हे समता, बुद्धिप्रामाण्यवाद, महिलांचे स्वातंत्र्य सन्मान, अहिंसा, सत्य, अस्तेय, असंग्रह, नैतिकता सांगतात. हिंसेने प्रश्न सुटत नसतात, तर वाढत असतात. सत्याने वागले तर मनस्ताप होत नाही. गरजेपेक्षा जास्त धनसंचय झाला तर प्रबोधनाऐवजी संपत्ती वाचविण्यासाठी शत्रूला शरण जावे लागते. त्यामुळे अतिरिक्त अनाधिकृत संपत्ती शरणांगत बनविते. क्रान्तीला अडथळा ठरते. त्यामुळे या नितीमूल्यांचे पालन करण्याचा आग्रह बुद्ध धरतात.

गौतम बुद्धांच्या विचाराने सम्राट अशोक प्रभावित झाले, त्यांनी लोककल्याणकारी राज्यकारभार केला. बुद्धाचा विचार जगभर गेला. आज जगातील सुमारे २२० कोटी लोक बौद्ध आहेत. बुद्धाला जगातील सर्वोत्कृष्ट महामानव मानले जाते. अनेक राष्ट्रांचा तो जीवनमार्ग झाला आहे. पण सनातन्यांनी ईश्वर, नामस्मरण, संस्कृती, पाप-पुण्य, देव, धर्म, कर्मकांड, यज्ञ, पूर्वजन्म- पुनर्जन्म इत्यादी बाबी आणून भारतातून बुद्धांचा विचार हद्दपार केला, परंतु विविध मार्गाने तो आजही जनमानसात टिकून आहे. संत तुकाराम महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, महात्मा फुले यांनी गौतम बुद्धांचा मुक्तकंठाने गौरव केलेला आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १९१० साली बडोद्यात बुद्धांचा पुतळा उभारून त्यांच्या विचारांचे जागरण केले. कृष्णाजी अर्जुन केळुस्करांनी मराठी भाषेतील पहिले बुद्ध चरित्र लिहिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध विचार भारतात अजरामर केला. विवेकानंद आणि ओशो यांच्या जीवनावर बुद्धांचा प्रभाव होता. प्राच्यविध्यापंडित शरद पाटील यांनी क्रातीकारक बुद्ध चरित्र मांडले.

आज जग युद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. असूया, अहंकार, द्वेष, हिंसा, टोळीयुद्ध, शीतयुद्ध, भ्रष्टचार, महासत्तेसाठी जीवघेणी स्पर्धा, व्यसनाधीनता, राग, संपत्तीची लालसा यामुळे मानव क्रूर बनत चालला आहे. त्यासाठी सतत युद्धाची भाषा बोलत आहे. हिंसक चित्रपट व त्याद्वारे पेरली जाणारी हिंसा, तिच्या पूर्तीसाठी भांडवली राष्ट्राची शस्त्रास्त्र उत्पादने युद्धसज्ज राष्ट्रांना विकत घ्यायला भाग पाडणे हे क्रूर राजकारण वाढत आहे. एवढे मात्र निश्चित की मानवी समूहाचा प्रश्न शस्त्राने-युद्धाने नव्हे, तर बुद्धानेच सुटणार आहे. जगाला शांतीचा, समतेचा, ज्ञानाचा, अहिंसेचा संदेश देणाऱ्या महामानवाला जयंतीनिमित्त विनम्र वंदन आणि सर्वांना शुभेच्छा!

**आजकाल**

# महिलांचा मोफत प्रवास विरुद्ध मेट्रो

**संजीव चांदोरकर**

इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तेलंगणा सरकार विरुद्ध तोफ डागली आणि चर्चांना उधाण आले आहे; त्यात नेहमीप्रमाणे राजकीय आर्थिक तत्वज्ञानाचे जे मुद्दे आहेत त्यावर चर्चा न होता त्याला स्वरूप दिले जातंय देशाचे पंतप्रधान वि एका राज्याचे मुख्यमंत्री.

**भाजप वि काँग्रेस**

डिझेलवर चालणाऱ्या बसेस वि क्लीन एनर्जीवर चालणारी मेट्रो असं.

गाभ्यात हा संघर्ष आहे

खाजगी भांडवलाच्या लॉजिकने चालणारे नवउदारमतवादी मॉडेल

विरुद्ध

देशातील ८० टक्के नागरिकांची पुरेशी क्रयशक्ती नसल्यामुळे वारंवार राबवल्या जाणाऱ्या लोककल्याणकारी योजनांमधील पार्श्वभूमी

१. तेलंगणा सरकारने डिसेंबर २०२३ मध्ये महालक्ष्मी योजना आणली; ज्या अंतर्गत राज्य परिवहन मंडळाच्या बसेस मधून सर्व वयाच्या महिलांना मोफत प्रवास करता येत आहे

२. हैद्राबाद शहरात गेली काही वर्षे इतर अनेक शहरांप्रमाणे मेट्रो रेल्वे प्रकल्प कार्यान्वित आहे; या मेट्रो कंपनीत ९०% भागभांडवल एल अँड टी कंपनीचे आहे तर १० % तेलंगणा सरकारचे. ६५ वर्षांच्या कन्सेशन कराराप्रमाणे एल टी कंपनी हि मेट्रो पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मॉडेलवर चालवत आहे.

३. महिलांना मोफत बस प्रवास योजना अर्थातच हैद्राबाद शहरातील उपनगरी प्रवासाला देखील लागू आहे. त्यामुळे हैद्राबाद शहरात महिला वर्ग बस कडे वळला आणि मेट्रोची प्रवासी संख्या कमी झाली; मेट्रो कंपनीचे उत्पन्न घटले आणि नफा कमी झाला.

४. अलिकडेच एलटीच्या एका डायरेक्टरनी एका मुलाखतीत सांगितले की अशा कमी प्रवासी संख्येवर कंपनी चालवणे आम्हाला कठीण जाईल, कदाचित २०२६ नंतर आम्ही आमचे भागभांडवल विकून टाकू

५. तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनी प्रतिसाद दिला; एलटी ने खुशाल जावे आम्ही दुसरा पार्टनर बघू, पण महालक्ष्मी योजना हैद्राबाद शहरासाठी सुरूच राहील

६. मुलाखतीत पंतप्रधान म्हणाले की आपण एकीकडे नागरी वाहतूक सुधारण्यासाठी मेट्रो सुरु करत आहोत; खाजगी कंपन्यांना पाचारण करत आहोत; आणि निवडणुकींवर डोळा ठेवून काही राज्य सरकारे फ्रीबीज वाटतात त्यामुळे या खाजगी कंपन्यांची व्हायबिलिटी कमी होते.

**गाभ्यातील मुद्दे काय आहेत**

१. हौद्राबाद मेट्रो फक्त ७० किमी कव्हर करते तर महालक्ष्मी योजना तेलंगणातील महिलांच्या हजारो किमी प्रवासासाठी लागू आहे.

२. खाजगी कंपनी आल्यानंतर तिला तिच्या अपेक्षेप्रमाणे नफा मिळवून देण्याची जबाबदारी देखील पीपीपी मधील पब्लिक पार्टनरच्या शिरावर पुढची ६५ वर्षे किंवा काही दशके ठेवायची?

३. तेलंगणाच्या योजना निवडणूकीवर डोळा ठेवून आणि केंद्र सरकारच्या अनेकानेक फ्रीबीज योजना काय शुद्ध बिगर राजकीय नैतिक तुपात घोळवलेल्या?

४. राज्यभर या योजनेअंतर्गत दररोज ३० लाख महिला प्रवास करतात; फक्त हैद्राबाद शहरात दररोज ६ लाख

५. तिकीट काढायला न लागल्यामुळे फक्त जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात या सर्व महिलांचे मिळून १२०० कोटी रुपये त्यांच्या पर्स मधेच राहिले आहेत;

त्याचा वापर त्या महिला छानचौकी वर नाही तर घरात चार जिन्नस आणण्यासाठी वापरणार; त्यावर त्या जीएसटी भरणार म्हणजे २०० कोटी रुपये सरकारकडे कर रूपाने परत येणार

६. शहरातील वाहतूक हा नागरी नियोजनाच्या समग्र दृष्टिकोनातूनच बघायला पाहिजे. पण त्याला हात न घालता भांडवल रिचवण्यासाठी एकामागोमाग एक भांडवल सघन नागरी पायभूत सुविधा प्रकल्प लादले जात आहेत.

महानगरातील वाहतुकीत मेट्रो, इतर रेल्वेचे प्रकार, बस, खाजगी वाहनांवर कर लावून त्यांच्या संख्येवर नियंत्रण, टॅक्सी / रिक्षा , दुचाकी, पादचारी अशा सगळ्यांचा एकत्रित विचार केला गेला पाहिजे. खाजगी कॉर्पोरेट काही शहरातील वाहतुकीचे प्रश्न सोडवण्याच्या उदात्त हेतूने मेट्रो उद्योगात उतरत नाहीत हे नक्की

७ आपल्या मालकीच्या राज्य परिवहन मंडळाला तेलंगणा सरकार अर्थसंकल्पातून मदत करणार हे उघड आहे. मी बेट लावून सांगतो, तेलंगणा सरकारने महिलांना मेट्रो रेल्वे प्रवास मोफत किंवा सवलतीत दिला आणि एलटी च्या मेट्रो कंपनीला सबसिडी/नुकसानभरपाई दिली तर केंद्र सरकार पासून सर्व तेलंगणा सरकारचा गालगुच्चा घेतील. नवउदारमतवादाचा सबसिडी विरोध लुच्चेपणाचा असतो, नेहमीच राहील. सार्वजनिक स्रोतातून/अर्थसंकल्पातून खाजगी कॉर्पोरेट मॉडेलची व्हायबिलिटी न वाढवता स्वतःच्या मालकीच्या परिवहन सेवेला धंदा दिला हे खरे दुखणे आहे.

**लोकसंसद**

### भारताची यशस्वी झेप

कोरोनाच्या साथीनंतर उद्योग, व अर्थव्यस्थेत खूपच बदल होत गेले आहेत. याचा परिणाम पर्यटन क्षेत्रावर सुद्धा झाला आहे. वर्ल्ड इकनॉमिकस फोरम ने ट्रॅव्हल व टुरिझम इंडेक्स जाहीर केला आहे . त्यानुसार जगातील ११९ देशांच्या यादीत यंदा भारत ३९ स्थानावर आहे. २०२१ साली जेव्हा इंडेक्स जाहीर केला तेव्हा भारताचा क्रमांक ५४ होता. अमेरिका, स्पेन, जपान, फ्रान्स,आणि ऑस्ट्रेलिया हे जगातील पहिले पाच देश आहेत. दक्षिण आशियातील अफगाणिस्तान, भूतान, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान व श्रीलंका या देशामध्ये भारत आघाडीवर आहे . पर्यटन क्षेत्रात प्रवाशांची मागणी चांगली आहे. भारतात अनेक गड किल्ले आहेत. जागतिक वारसा स्थाने ४० व्या वर आहेत. याशिवाय जागतिक दर्जाचा ताजमहाल व वेरूळ व अजिंठा ची लेणी आहेत. गोव्यातील समुद्र किनारे परदेशी व देशी प्रवाशांना भुरळ पाडतात. काश्मीरचे निसर्ग सौंदर्य तर अप्रतिम आहे. तामिळनाडू मध्ये अनेक जुनी व प्राचीन मंदिरे आहेत. तर राजस्थानातील अनेक राजवाडे आपली दिमाख बाळगून आहेत. सध्या आखाती देशांनी पर्यटन क्षेत्रात आघाडी घेतली आहे. हे देश २० टक्क्यांनी पुढे आहेत. अमेरिकेने सुद्धा चांगली कामगिरी केली आहे पर्यटनामुळे अनेक लोकांना रोजगार मिळतो.

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२३ मे**

**१८९६:-** मराठीतील प्रसिध्द समीक्षक, संगीतकार, नाटक, चित्रपट, क्रिकेट आदी विषयांचे अभ्यासक आणि लेखक केशवराव वामन भोळे यांचा जन्म. 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाला केशवरावांनी संगीत दिले तर गीत गायन केले त्यांच्या पत्नी ज्योत्स्ना भोळे यांनी. मराठी साहित्य जगतात संगीतविषयक लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. 'एकलव्य' या टोपणनावाने त्यांनी अनेक संगीतविषयक लेख लिहिले. 'वसुंधरा' साप्ताहिकातून प्रसिध्द झालेले त्यांचे लेख 'आजचे प्रसिध्द गायक' या पुस्तकात संकलित झाले. याच पुस्तकाची सुधारित आवृत्ती 'संगीताचे मानकरी' या नावाने प्रसिध्द झाली. 'शुद्धसारंग' या टोपण नावानेही त्यांनी लेखन केले. 'आवाजाची दुनिया', 'अस्ताई', 'अंतरा', 'वसंतकाकाची पत्रे', 'माझे संगीत', 'जे आठवते ते' ही त्यांची पुस्तके प्रसिध्द आहेत. परखड भाषा, चिकित्सक वृत्ती, संगीतविषयक जाण आणि उपहासप्रचुर शैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये. **१९०९:-** कवी, ललित गद्य लेखक नारायण माधव संत यांचा जन्म. ख्यातनाम कवियत्री इंदिरा संत यांचे ते पती. 'सहवास' हा या पतिपत्नीचा काव्यसंग्रह. पुढे नारायणराव लघुनिबंधकार म्हणून गाजले. 'उघडे लिफाफे' हा त्यांच्या लघुनिबंधाचा संग्रह त्यांच्या नितळ, रसिक आणि सौंदर्यवादी वृत्तीला दर्शन घडवतो. वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी विषमज्वराच्या आजाराने त्यांचे अचानक निधन झाले तेव्हा तात्कालिन साहित्य विश्व हळहळले. **१९२६:-** लेखक प्रा.बापूसाहेब शामराव कुंभोजकर यांचा जन्म. ह्यांचे 'कुंपण', 'गंगेत घोडं न्हालं', 'जमिनीवरील थेंब' हे कथासंग्रह आणि चित्रपट कथा त्यांच्या नावावर आहेत. **१९२८:-** लेखक, दिग्दर्शक, बालसाहित्यिक आणि वृापत्रातून प्रासंगिक लेखन करणारे यशवंत शंकर कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांचे 'उदंड झाले बलिदान' ह्या क्रांतिकारकांच्या कथा, मराठी व्याकरण व लेखन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पुस्तकासह. 'खाशी खोड मोडली', 'पिंटू' तसेच 'नारायणराव पेशवे', 'माधवराव पेशवे' ही लहान मुलांसाठी पुस्तके लिहिलीत. **१९३५:-** भूगोल विषयातील एक तज्ञ. मराठी विश्वकोशाचे अभ्यागत संपादक, लेखक सुदाम पुंडलिक पाठक यांचा जन्म. ह्यांची 'आर्थिक भूगोल', 'प्राकृतिक भूगोल भाग १,२', 'भारताचा सामान्य आणि प्रादेशिक भूगोल', 'भारताचे आर्थिक आणि व्यापारी भू-विज्ञान', 'मानव आणि पृथ्वी', 'मानवी भूगोल', 'मान्सून आशिया', 'व्यापारी भूगोल' आदी भूगोल विषयक नाटयपुस्तके प्रसिध्द. **१९३६:-** लेखिका वनिता देशमुख यांचा जन्म. लहान वयातच लिखाणाची आवड. विविध साप्ताहिके, मासिके यातून गूढ, सामाजिक, विनोदी स्वरुपाच्या कथा व लेख प्रसिध्द. 'स्वच्छंदी', 'पाणवठ्याचे पक्षी', 'रानाची वाट' इ. सदरे वृापत्रातून लिहिलीत. 'कावळ्याचं घर' या त्यांच्या पुस्तकातून मुलांना निसर्गाचा परिचय व्हावा ह्या जाणीवेने त्यांनी काही कथा व कविता लिहिल्या आहेत. **१९४०:-** राज्यशासनाचे अभ्यासक, ग्रंथकार रामचंद्र गणेश प्रधान यांचे निधन. 'भारत सेवक' या मासिकाचे संस्थापक, संपादक प्रधानांनी 'प्रतिनिधिसत्ताक राज्यपध्दती : प्लेटो व त्याचे राजकीय विचार' या पुस्तकांशिवाय 'मॉरिस मेंटलिंकच्या', 'मोनाव्हेना' या नाटकाचे 'विमलादेवी' या नावाने रुपांतर केले. **१९४२:-** धर्मशिक्षकांसाठी साहित्य निर्मिती व अभ्यास सत्रे भरविणारे लेखक फादर मायकल गोन्सालवीस यांचा जन्म. 'इस्पू' हे आदिवासींच्या वेठबिगारीवरील तर 'करणी' हे अंधश्रध्देवर प्रहार करणाऱ्या नाटकासह, 'खूप उशीर झाला' ही एकांकिका आणि 'जीवन ज्योति धर्मपाठमाला' ही पाठयपुस्तके अशी साहित्य संपदा. **१९५८:-** लेखिका कल्पना जाधव यांचा जन्म. 'उपेक्षित' ही त्यांची कादंबरी प्रकाशित झाली. **१९८६:-** लेखक गणेश गोविंद कुलकर्णी यांचे निधन. 'दलित आणि ललित' या समीक्षात्मक पुस्तकासंह अनेक समीक्षात्मक लेख विविध वृत्तपत्रे, नियतकालिकांतून प्रसिध्द. **१९९४:-** अत्यंत परखड आणि खळबळजनक विधानांमुळे मराठी साहित्याचे फौजदार अशी ओळख करणारे लेखक, समीक्षक माधव मनोहर यांचे निधन. त्यांचे आडनाव वैद्य तथापि मनोहर हे आडनाव घेऊनच ते लेखन करत. इंग्रजीतील अनेक दर्जेदार साहित्याचा अनुवाद करणाऱ्या मनोहर यांनी स्वतंत्रपणे कथा, कादंबऱ्या आणि नाटकेही लिहिलीत. त्यामध्ये 'आई', 'सशाची शिंगे', 'आजोबांच्या मुली' ही नाटके. तसेच 'ज्वाला' ही स्वतंत्र कादंबरी. 'दौरा', 'अन्नदाता', 'किल्ल्या' हे अनुवादीत साहित्य याशिवाय दीडशेच्यावर कथा लिहिल्या. पण ते गाजले खऱ्या अर्थाने समीक्षक म्हणून. 'मराठी नाटक थिटे का?', 'मराठी नाटक वयात आले?' या समीक्षात्मक लेखांच्या शीर्षकांनीच त्यावेळी खळबळ उडवून दिली होती. त्यांची समीक्षा साहित्यिकांना मार्गदर्शक ठरावी अशी असे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ मे

१) श्रीम. माधुरी गोविंद आठवले अलिबाग २३-०५-१९४८
२) श्री. मधुकर कमलाजी तळकर रामनाथ-ता.अलिबाग २३-०५-१९५०
३)श्री. प्रकाश कृष्णराव गंधारे कलेक्टर ऑफीसजवळ, अलिबाग २३-०५-१९४७
४) श्रीम. प्रतिभा राजाराम डबरी नागडोंगरी, अलिबाग, २३-०५-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखलअसलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



आजचे अन्नदाते


**जान्हवी अमेय गुरव, वाढदिवस**

# ओजस पाटीलचा तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान

## कोणत्याही खासगी कोचींग क्लासला न जाता ९५ टक्के

**। अलिबाग । वार्ताहर ।**

दहावी-बारावीसाठी खासगी कोचिंग क्लासला लाखभर रुपये भरून पास होण्यासाठी झगडणाऱ्या विद्यार्थ्यांना अलिबाग विजयनगर येथील ओजस संजय पाटील याने कुठलाही खाजगी क्लास न लावता स्वयं अध्ययन करीत बारावीला ९५ टक्के गुण पटकावत एक धडा दिला आहे. जनता शिक्षण मंडळाच्या महाविद्यालयातून शास्त्र शाखेतून बारावीची परिक्षा देणाऱ्या ओजस पाटीलने एकूण ६०० पैकी ५७० गुण संपादन केले आहेत. जेएसएम कॉलेज तसेच अलिबाग तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान देखील ओजसने पटकावला आहे.



ओजस पाटीलला गणितात ९८, भौतिकशास्त्रात ९६, रसायनशास्त्रात ९४, संगणक विज्ञानात १९८ तर इंग्रजी विषयामध्ये ८४ गुण मिळाले आहेत. आपल्या यशाबद्दल बोलताना ओजसने सांगितले की, मी कधीही गैरहजर न राहता नियमित सर्व विषयांच्या लेक्चरला उपस्थित राहायचो. विद्यार्थ्यांना संदेश देताना त्याने सांगितले की, तुम्हाला जेवढे आवडेल तितके मनापासून अभ्यास करा. ऑनलाईन माध्यमातून तुम्हाला खूप चांगल्या प्रकारे अभ्यास करता येईल. कोचिंग क्लासला येण्या-जाण्यात वेळ वाया घालवण्यापेक्षा घरीच अभ्यास करून त्यासाठी जास्त वेळ देता येईल, असे त्याने आवर्जून सांगितले. विशेष म्हणजे ओजसने दहावीत देखील सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला होता. ओजसच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# द.ग.तटकरे विद्यालयाचा ९४ टक्के निकाल

**। कोलाड । वार्ताहर ।**

द.ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक एचएससी परीक्षेचा निकाल ९४ टक्के लागला असुन विज्ञान शाखेचा १०० टक्के, वाणिज्य शाखेचा ९६ टक्के, तंत्रज्ञान शाखेचा ९२ टक्के, तर कला शाखेचा ८५ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतील शर्वरी चौधरी ८४.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, तर प्रज्वल झोलगे ८२.५० टक्के गुण मिळवून द्वितीय, मानस रटाटे ८१.६७ टक्के गुण मिळवून तृतिय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.



इंग्रजी वाणिज्य शाखेतील गौरी पाटील ७९.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, खुशबू मोरे ७९.५० टक्के गुण मिळवून द्वितीय, प्रियांका महाडिक ७९.३३ टक्के गुण मिळवून तृतिय तर, वाणिज्य (संयुक्त) शाखेतील शावनी शिंदे ७१.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, रिया महाबळे ७०.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय, हर्षल भोसले ६८.६७ टक्के गुण मिळवून तृतिय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

तसेच, कला शाखेतील सिद्धी पवार ८३.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, तनु सिंग ७३.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय, वैशाली चिविलकर ७१ टक्के गुण मिळवून तृतिय, तर, तंत्रज्ञान शाखेत देवेन रटाटे ६७.५० टक्के गुण मिळवून प्रथम, शैलेश डविलकर ६७ टक्के गुण मिळवून द्वितीय, ओमकार मोरे ६३.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

## तळोजा कॉलेजचा १०० टक्के निकाल

**पनवेल :** तळोजा येथील कमळ गौरी हिरु पाटील शिक्षण संस्थेच्या बी.के. पाटील ज्युनिअर कॉलेज व द ईलाईट पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन बबन पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## परमार कॉलेजचा निकाल १०० टक्के

**नागोठणे :** नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील शैक्षणिक संकुलातीम एस.डी. परमार इंग्लिश मिडीयम ज्युनिअर कॉलेजचा इयता बारावी वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. ज्युनिअर कॉलेजचे सर्व ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात प्रथम क्रमांक आमिन अधिकारी ८६.३३%, द्वितीय क्रमांक क्रित दोशी(८२.८३%),तर तृतीय क्रमांक मेहेक खोत ७८.८३% यांनी मिळविला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कला शाखेत मयुरी शिद अव्वल

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव या महाविद्यालयाचा कला शाखेचा बारावीचा निकाल ६८ टक्के लागला असून यावर्षी देखील मुलींनी बाजी मारली आहे.



नांदगाव महाविद्यालयात कला शाखेत शिक्षण घेणारी आदिवासी समाजातील मयुरी काशिनाथ शिद ही गरीब कुटुंबातील विद्यार्थीनी ७३.६७ टक्के गुण मिळवून तालुक्यात कला शाखेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तिचे आई-वडील मोलमजुरी करून आपल्या मुलांचे शिक्षण पूर्ण करत आहेत. मयुरीने आपल्या खडतर आर्थिक परिस्थितीवर मात करून उज्वल यश मिळविले आहे. तिच्या या यशाबद्दल प्राचार्य, शिक्षक वृंद आणि संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# माणगाव कॉलेजचे नेत्रदीपक यश

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

बारावीच्या परीक्षेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेज माणगाव या उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम राखीत नेत्रदीपक यश संपादन केले. या बारावी परीक्षेमध्ये कॉलेजच्या विज्ञान शाखेचा एकूण १०० टक्के वाणिज्य शाखेचा ९५.४८ टक्के तर कला शाखेचा ९८.३८ अक्के इतका लागला आहे. विज्ञान शाखेतून अक्षत चव्हाण या विद्यार्थ्याने ८८.८३% इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. तर, सारा चौधरी या विद्यार्थिनीने ८७.८३% गुण मिळवून द्वितीय क्रमांक, अंजली चौधरी या विद्यार्थिनीने ८६.८३ % गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. वाणिज्य शाखेमधून सोहम जांबरे या विद्यार्थ्याने ६८.१७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला असून श्रुती शिंदे या विद्यार्थिनीने ६८% गुण मिळवून द्वितीय क्रमांक, कावेरी तूपट या विद्यार्थिनीने ६७.६७% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. कला शाखेमधून सलोनी खराडे या विद्यार्थिनीने ७६.८३% गुण मिळवून प्रथम क्रमांक, विनय भोनकर या विद्यार्थ्याने ७३.१७% गुण मिळवून द्वितीय, तेजस तळेकर या विद्यार्थ्याने ७३% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावत उत्तीर्णत झाले आहेत.

## ऊर्दू कॉलेजचा ८२.३५ टक्के निकाल

**। नागोठणे । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील एकमेव ऊर्दू माध्यमाचे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज असलेल्या नागोठणे एज्युकेशन सोसायटी, नागोठणे संचलित ऊर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता बारावीचा (संयुक्त शाखेचा) निकाल ८२.३५% लागला आहे. यामध्ये मुल्ला मोहसीन ८८.५०%, पटेल अलिना ७९.६६% व रईस अम्मारा ७४.६६% हे विद्यार्थी पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. तसेच, कला शाखेतून मुजावर शिफा ५६.००%, बोडेरे फहद ४२.००%, शेख सायमा ३९.३३% हे विद्यार्थी पहिल्या तीन क्रमांकाने उत्त्तीर्ण झाले आहेत. यावेळी सर्व यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## गोखले महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून गेली अनेक वर्षापासून यशाची परंपरा कायम ठेवली आहे. वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक मेहरीन शेख ६८.००%, व्दितीय क्रमांक निधी काजारे ६५.३३% व तृतीय क्रमांक अर्पित सावंत ६४.५०%. तसेच, विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक अदिती बाक्कर ६९.५०%, व्दितीय क्रमांक शर्वरी केळसकर ६८.३३% व तृतीय क्रमांक माझ काझी ६८.००% यांनी पटकिावला आहे.

## विज्ञान शाखेतून सुरज ठाकूर सर्वप्रथम

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या कै. बापुसाहेब देशपांडे विद्या संकुलातील कै. सरेमल प्रतापमल जैन कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान, वाणिज्य व कला या तिन्ही शाखेचा बारावीचा एकूण निकाल ९१.८५ टक्के इतका लागला आहे. यावेळी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विज्ञान वाणिज्य व कला या तिन्ही शाखा मिळून एकूण ३०७ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. यातून २८२ विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेतून सुरज ठाकूर हा विद्यार्थी ९०.६७ % गुण मिळवुन प्रथम आला आहे. तर, सार्थक म्हात्रे ८६.५०%, धनश्री पाटील ८०.३३% हे विद्यार्थी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेत निवेदन नाईक याने ७१.१७% गुण मिळवून प्रथम पटकाविला. तर, अमिषा ताडकर ६५.६७%, सुमित म्हात्रे ६३.५९% हे विद्यार्थी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

याचबरोबर कला शाखेतून भाग्यश्री ठाकूर ही विद्यार्थिनी ७१.७६% गुण प्राप्त करत प्रथम आली. तर, अंकिता अंभोरे ६६.८३% व प्रणय बडे ६३.३३% हे विद्यार्थी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

## राऊत महाविद्यालयाचा उज्वल निकाल

**श्रीवर्धन :** येथील रविंद्र ना. राऊत कनिष्ठ महाविद्यालयाने खालीलप्रमाणे उज्वल यश संपादन केले असल्याची माहिती प्राचार्य गणेश पाटील यांनी दिली. कला शाखा: प्रविष्ट झालेले विद्यार्थी-३७, उत्तीर्ण विद्यार्थी-३३, निकालाची टक्केवारी- ८९.१८ %. वाणिज्य शाखा: प्रविष्ट विद्यार्थी- १११, उत्तीर्ण विद्यार्थी- १०५, निकालाची टक्केवारी- ९४.५९. यावेळी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाचालक, शाळा समिती, प्राचार्य यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

## दिघीचा निकाल शंभर टक्के

**श्रीवर्धन :** श्री. घन:श्याम तळवटकर एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज दिघीचा जाहीर झालेला बारावीचा निकाल शंभर टक्के लागला असून निकालात मुलींनी बाजी मारली आहे. गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांकाचे मानकरी रईस अमरीया अल्ताफ ७३.८३%, दाते सलवा अकील ७२%, मुकादम दानिया एजाज ७०.५०% हे ठरले आहेत. संस्थेच्या प्रमुख रंजना तळवटकर, सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक सचिन मापुस्कर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

## कुलकर्णी महाविद्यालयाचा निकाल ९१.४४ टक्के

**। बोर्ली पंचतन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील जनता शिक्षण संस्थेच्या नानासाहेब कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल ९१.४४% लागला असून २२२ विद्यार्थ्यांपैकी २०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाखानिहाय निकालानुसार विज्ञान शाखेचा निकाल यावर्षीही १०० टक्के लागला असून सर्व ५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये प्रथम क्रमांक सुजल जाधव ७५.१७%, द्वितीय क्रमांक मनाली नागे ७०.३३%, तृतीय क्रमांक सुकृत भायदे ६९.३३%. तर, वाणिज्य शाखेच्या ९३ विद्यार्थ्यांपैकी ८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यामध्ये स्वदेश पाटील प्रथम क्रमांक ८१.१७%, जान्हवी धाडवे द्वितीय क्रमांक ७३.५०%, सशांत खेऊर तृतीय क्रमांक ७३.१७%., कला शाखेच्या एकूण ७२ विद्यार्थ्यांपैकी ५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून मनीषा साहू प्रथम क्रमांक ६४%, राहुल चाळके ६२.६७% तर उत्कर्षा कांबळे तृतिय क्रमांक ६०.१७% गुण मिळवून उत्तीर्ण झाले.




## प्रायव्हेट कॉलेजचा ९२.६२ टक्के निकाल

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९२.६२ टक्के लागला आहे. शास्त्र या शाखेत २०६ विद्यार्थ्यांपैकी २०४ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९९.०२ टक्के निकाल लागला. कला शाखेत १७६ विद्यार्थ्यांपैकी १४२ पास होऊन ८०.६८ टक्के निकाल लागला. तर, वाणिज्य शाखेत १७४ विद्यार्थ्यांपैकी १६९ पास होऊन ९७.१२ टक्के निकाल लागला. शास्त्र विषयात प्रथम क्रमांक चव्हाण मयुरेश ८९.९१ टक्के, तर द्वितीय क्रमांक प्रजापती रोशन ८७.५० टक्के, तृतीय क्रमांक शाह युग ८६.५० टक्के मिळवून उत्तीर्ण. वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक कदम कृपा ९५.३३ टक्के, द्वितीय क्रमांक नवाळे हार्दीक ९३.८३ टक्के, तृतीय क्रमांक लांगी मनस्वी ९३.५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण. तसेच, कला शाखेत प्रथम क्रमांक सावंत रोशनी ७५.०० टक्के, द्वितीय क्रमांक पाटील तन्वी ७३.०० टक्के, तृतीय क्रमांक दोरे ज्योती ६९.३३ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

# दक्षता म्हात्रेचा विशेष सत्कार

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड शहरातील अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी दक्षता दतात्रेय म्हात्रे हिला ६०० पैकी ५४० गुण मिळवून ९० टक्के प्राप्त करून ती मुलगी मुरुड तालुक्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.



दक्षता म्हात्रेचा विशेष सत्कार अंजुमन व्यवस्थापन कमिटीतर्फे करण्यात आला. यावेळी अंजुमन इस्लाम जंजिरा मुरुडचे सह सचिव व अंजुमन इस्लाम मुरुड शाखेचे हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे चेरमन रहीम कबले यांच्या हस्ते पुष्पगुछ देऊन या विद्यार्थिनीस सन्मानित करण्यात आले. कृषी विभागाचे चेरमन अब्दुल वाहिद हुरजूक, जुनिअर कॉलेजचे शिक्षक अन्सार शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात अंजुमन इस्लाम जंजिरा मुरुडचे सह सचिव व अंजुमन इस्लाम मुरुड शाखेचे हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे चेरमन रहीम कबले यांनी दक्षताचे कौतुक करून बीएस्सीचे शिक्षण अंजुमन महाविद्यालयात घ्यायचे असल्यास मोफत प्रवेश तसेच सर्व शिक्षण मोफत देण्यास तयार असल्याचे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे आज पर्यंत बारावीत कोणीही ९० टक्के गुण काढले नव्हते. एक नवा विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल त्यांनी दक्षताचे कौतुक केले.

# ग्रामसेवकांच्या बदल्या करण्याचे आदेश

**। उरण । प्रतिनीधी ।**

उरण-पनवेल तालुक्यात सिडकोचा भत्ता भेटत असल्यामुळे गेली अनेक वर्षे ग्रामसेवक आर्थिक मलिंदा देत कार्यरत आहेत. ज्यांची सेवा तालुक्यात १५ ते २० वर्षांपेक्षा जास्त झाली आहे, त्यांची बदली महाड पोलादपूर याठिकाणी करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी यांनी दिले आहेत. यामुळे उरण पनवेल मधील ग्रामसेवकांचे धाबे दणाणले आहेत.

सिडकोच्या माध्यमातून घरभाडे मिळत असल्याने शासकीय नोकरीत असूनही अनेक शासकीय नोकरदार हे सिडको भागातच घरभाडे मिळावे यासाठी आपल्या वरिष्ठांच्या आर्थिक साटेलोटातून गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील इतर तालुक्यात कोणी जाण्यास तयार होत नाही. यामध्ये ग्रामसेवक मंडळींचाही समावेश आहे. उरण-पनवेल तालुक्यात गेली १५ ते २० वर्षे होऊनही याच ठिकाणी कार्यरत आहेत. यामुळे जिल्ह्यातील इतर ग्रामपंचायतमध्ये एका ग्रामसेवकांना ३ ते ४ ग्रामपंचायतचा कारभार पहावा लागत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कारभार सुस्त झाला आहे.

मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामसेवकांच्या बदल्या होतात की फक्त कागदावरच होतात हे लवकरच समजेल. तरी काही ग्रामसेवक गेली अनेकवर्षे कार्यरत असूनही सिडकोच्या भत्ते सोडू नये यासाठी मोर्चेबांधणी करण्यात मग्न असल्याचे दिसत आहे.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेससमोर, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ईमेल ddr_red@rediffmail.com

जा.क्र.जिऊनि/कात-१०/अपसेटप्रा./जा. नोटीस/१०३६/सन २०२४ दिनांक १४-०५-२०२४

**जाहीर नोटीस**

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (११) अन्वये नोटीस)**

वसुली अधिकारी,
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग
नटराज प्रिमायसेस, पीएनपीनगर-अलिबाग-रायगड ... अर्जदार
विरुद्ध
१. ईझी शॉपी इंटरप्रायझेस प्रा.लि.राजि,
ऑफिस पत्ता दत्तात्रेय को.ऑप.हौसींग सोसायटी, प्लॉट नं. १७, एमआयडी ऑफीससमोर अलिबाग
२. श्रीम. शकुंतला सुर्यकांत लाखे, ...गैरअर्जदार
मु.९१६/८, कृष्णधाम को.हौसिंग सोसायटी, ता. अलिबाग, जि. रायगड
३. श्रीम. रोहीनी मनोज लाखे,
मु.९१६/८,कृष्णधाम को.हौसिंग सोसायटी ता. अलिबाग, जि. रायगड
४. श्री. मनोज सुर्यकांत लाखे,
मु.९१६/८, कृष्णधाम को. हौसिंग सोसायटी ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्ञानदीप सहकारी को.ऑप क्रेडिट सो.लि.मुंबई या संस्थेचे कर्ज थकीत झालेमुळे प्रतिवादी यांचेविरुद्ध प्राप्त केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम१९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत वसुलीचे प्रमाणपत्राची अंमलबजावणीची कार्यवाही वसुली अधिकारी यांनी कलम १५६ व नियम १०७ अन्वये खालील मालमत्ता जप्त करुन जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी सदर मालमत्तेचे शासकीय दराचे मुल्य रक्कम ही वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव दाखल केला आहे.

| अ.क्र. | मालमत्ता मालकाचे नाव | मालमत्ता स्थळ | मालमत्ता वर्णन तपशील | शासकीय दराने मुल्य | बाजारभाव दराने मुल्य | डीस्ट्रेस व्हॅल्यु |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे.ईझी शॉपी इंटरप्रायझेस लि.राजि, ऑफीस पत्ता दत्तात्रेय को.ऑप हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १७, एमआयडी ऑफीससमोर अलिबाग | मौजे चेंढरे ग्रामपंचायत | १. मौजे चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील श्री. दत्तात्रेय को. ऑप हौसिंग सोसायटी मधील तळमजल्यावरील दुकान व गाळे ग्रामपंचायत मिळकत क्र. ११९१/७ ते १५ क्षेत्रफळ २८११, | १,७३,६७,३४६/- | २,६७,०४,५००/- | २,२६,९८,८२५ |
| | | | २. मिळकत क्र.११९१/१६ क्षेत्र १९१.०० चौ.फुट, | ११,८०,०००/- | १४,३२,५००/- | १२,१७,६२५/- |
| | | | ३. मिळकत क्र.११९१/१७ क्षेत्र २८५ चौ.फुट | १७,६०,६१२/- | २१,३७,५००/- | १८,१६,८७५/- |
| | | | एकूण | २,०३,०७,९५८/- | ३,०२,७४,५००/- | २,५७,३३,३२५/- |

मालमत्ताधारक आणि त्यातील हितसंबंधी यांनी सदर रकमेस वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता का देण्यात येवू नये? याबाबत प्रतिवादी यांना म्हणणे मांडण्यासाठी दि. १०-०५-२०२४ रोजीच्या सुनावणीची नोटीस संबंधितांना रजिस्टर्ड पोच देय डाकेने पाठविण्यात आली असता कर्जदार/सहकर्जदार व जामिनदार यांना नोटीस पोच झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कर्जदार/सहकर्जदार व जामिनदार हजर राहिले नाहीत. अगर त्यांचे म्हणणे प्राप्त झाले नाही. तरी सर्व संबंधितांना आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर दिनांक ३०-०५-२०२४ रोजी स.११.३० वाजता आवश्यक पुराव्यासह उपस्थित रहावे अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून आपले गैरहजेरीत सुनावणी कामकाज पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :-१५-०५-२०२४

**सही/-**
**(प्र.भा.जगताप)**
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

**निवडक**

## अज्ञात इसमाचा मृतदेह

**पनवेल :** पनवेल परिसरात एका अज्ञाात इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मनोज वाल्मिकी (४९) असे या मृत इसमाचे नाव असून त्याला वाशी येथील एमजीएम रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान मनोज वाल्मिकी या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. याबाबत पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे करीत आहेत.

## पार्कींगमधून दुचाकीची चोरी

**पनवेल :** कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलच्या पार्कींगमध्ये उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. सुकापूर येथे राहणारे प्रफुल्ल कदम यांनी त्यांची दुचाकी एमजीएम हॉस्पिटलच्या पार्कींगमध्ये उभी करून ते हॉस्पिटलमध्ये नातेवाईकांना भेटायला गेले. भेटून परत आले असता त्या जागी ठेवलेली दुचाकी आढळून आली नाही. या संदर्भात त्यांनी अज्ञात चोरट्यांविरोधात पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## लाखो किंमतीचे दागिने चोरीस

**पनवेल :** लाखो रुपये किंमतीचे दागिने घरातील बेडरुममध्ये असलेल्या कपाटातून अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे. कामोठे वसाहतीमधील सेक्टर २१ येथे राहणाऱ्या पुजा मगर यांनी त्यांच्या घरातील बेडरुममधील कपाटामध्ये ठेवलेले जवळपास ३ लाख २५ हजार रुपये किंमतीचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सुतारवाडीतील नेटवर्क गायब

**सुतारवाडी :** सुतारवाडी आणि अन्य परिसरात गेल्या पाच दिवसांपासून वादळी वाऱ्यासह तुरळकपणे कोसळणाऱ्या पावसामुळे परिसरातील मोबाईलचे नेटवर्कही गायब झालेले आहे. येथील पंचक्रोशिमध्ये काहींचे वादळी वाऱ्यामुळे नुकसान झाले होते. याबाबत मुंबई तसेच अन्य शहरात नोकरी निमित्त गेलेले चाकरमानी गावाकडे फोन करून चौकशी करत असतात. परंतु, नेटवर्क गायब झाल्याने मोबाईलवरील बोलणे काही समजत नसल्यामुळे तेथील नातेवाईक चिंतेत आहेत.

## कर्जतमध्ये नर्सेस डे साजरा

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे असलेल्या डॉ. नंदकुमार तासगावकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल कॉलेज रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्यावतीने नर्सेस डे साजरा करण्यात आला. पहिल्या महिला नर्स म्हणून लेडी नायटेंगल यांच्या जयंती प्रीत्यर्थ आंतरराष्ट्रीय स्तरावर नर्सेस डे साजरा केला जातो. मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. विनायक सबनीस, डॉ. हब्बू जाधव यांनी नर्सेस यांना मार्गदर्शन केले. यावेळी महेश काशीद, आशा पवार आदी प्रमुख उपस्थित होते.

# द्रोणागीरी नोडमध्ये बिल्डर लॉबीकडून नियमांची पायमल्ली

### ■ परवाना भोगवटा प्रमाणपत्र नसतानाही इमारतींमध्ये वास्तव्यास

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोडमधील इमारतींना वापर परवाना भोगवटा प्रमाणपत्र म्हणजेच ओसी अद्याप मिळालेली नसतानाही हजारो कुटुंब वास्तव्यास आहेत. हे वास्तव्य कायदेशीर नसले तरी त्या रहिवाशांवर कुठेही कारवाई होताना दिसत नाही. मात्र, महारेरा याकडे दुर्लक्ष करीत असल्याने सिडको अधिकाऱ्यांबरोबर महारेरा यांचेही आर्थिक हितसंबध जपले जात असल्याची चर्चा सुरू आहे.



सिडकोच्या माध्यमातून उरणमध्ये द्रोणागिरी नोडची निर्मिती करण्यात आली आहे. लवकरच उरणपर्यंत रेल्वे येणार असल्याने बिल्डर लॉबीकडून इमारती उभ्या केल्या जात आहेत. परंतु, नोडमध्ये काही ठिकाणी सीआरझेड लागू करण्यात आल्याने इमारती उभ्या करण्यास अडचणी होत असतानाही काही बिल्डर नियमांची पायमल्ली करून बांधकाम करीत आहेत. त्यात आणखीन भर म्हणजे द्रोणागिरी नोडमधील नामवंत बिल्डरांकडून १० ते १५ मजली आलिशान टॉवर उभे करण्यात आले आहेत. परंतु, काम पूर्ण होऊन इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र म्हणजेच ओसी अद्याप मिळालेली नाही. कोणतीही इमारत उभी केल्यानंतर त्यांना भोगवटा प्रमाणपत्र म्हणजेच वापर परवाना (ओसी) मिळाल्याशिवाय इमारतींचा वापर करू शकत नाही. अशा प्रकारचे कडक निर्बंध असतानाही त्याचे उल्लंघन करून सर्रासपणे इमारतींमध्ये वास्तव्य व इतर सर्व सुखसोयी नियमाला बगल देत बिल्डरांनी ग्राहकांना दिल्या आहेत. तसेच, सीआरझेडचे खुलेआम उल्लंघन बिल्डरांकडून सुरू आहे. याबाबत बिल्डरांकडे विचारणा केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.

द्रोणागिरी नोडमध्ये उभ्या रहाणाऱ्या इमारती या ज्यांच्या अधिपत्याखाली सुरू आहेत, त्या संबंधित विभागांच्या अधिकारी वर्गाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, बांधकाम व्यावसायिकांना नियामकाकडे नोंदणी केल्याशिवाय प्रकल्पाची जाहिरात, विक्री, बांधकाम, गुंतवणूक करता येत नाही. नोंदणीनंतर, सर्व जाहिरातींमध्ये महारेराद्वारे प्रदान केलेला नोंदणी क्रमांक असणे अपरिहार्य आहे. एखादा बांधकाम व्यावसायिक अशा प्रकारे नोंदणी क्रमांक नमूद न करता जाहिरात करत असेल, तर त्यासंदर्भात महारेराकडे तक्रार करता येते. अशा बांधकाम व्यावसायिकावर दंडात्मक कारवाई ममहारेरा करू शकते.

उरणमध्ये वाढत्या औद्योगिककरणामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व रेल्वे लवकरच सुरू होणार असल्याने निकृष्ट दर्जाचे बांधकाम करून ग्राहकांच्या माथी मारण्याचे प्रयत्न बिल्डरकडून सुरू आहेत. तरी याची सखोल चौकशी करावी. तसेच, द्रोणागिरी नोडमध्ये ज्या इमारतींना ओसी नसतानाही वापर सुरू आहे त्या इमारतीत भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यावर जबाबदार कोणाला धरणार, असा सवालही यानिमित्ताने उभा रहात आहे.

## करंजा रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

**उरण :** उरण-करंजा या मुख्य रहादारीच्या रस्ताला सतराशे साठ खड्डे पडले असून रस्ता धोकादायक बनत चालला आहे. त्यामुळे कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळ्यात तर रस्ताच शिल्लक राहणार नसल्याची खंत सचिन डाऊर यांच्याकडून व्यक्त केली जात आहे. चाणजे ग्रामपंचायत हद्दीमधील नागरिकांना बाजारासाठी तसेच उरण ते अलिबाग जल प्रवासी प्रवाशांसाठी करंजा-उरण या मुख्य रस्त्याचा वापर करावा लागत आहे. त्यातच करंजा बंदराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून या रस्त्यावर अवजड वाहनांची रेलचेल वाढली आहे. त्यामुळे डाऊर नगर, मुळेखंड या ठिकाणावरील रस्त्यावर खड्डे पडले असून वाहतूकीसाठी रहदारीचा मुख्य रस्ता धोकादायक बनला आहे. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे एखादा मोठा अपघात होऊन जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## म्हसळ्यात शस्त्रक्रिया शिबीर संपन्न



**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा ग्रामिण रुग्णालयाचे उद्घाटन २००२ साली झाले होते. त्यानंतर तब्बल १२ वर्षानंतर रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. महेश मेथा यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत गायकवाड आणि ग्रामिण रुग्णालयातील संपूर्ण वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या सहकार्यातून कुटुंब कल्याण शास्त्रक्रिया शिबीर संपन्न झाले. या शिबिरात एकूण २२ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

ग्रामिण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. महेश मेथा यांच्या संकल्पनेतून रुग्णालयात वर्षभरात अनेक उपक्रम आणि शासनाच्या योजना यशस्वीपणे राबविल्या जातात. त्यामध्ये क्षयरोग निर्मूलन, कुपोषण निर्मूलन, रक्तदान शिबीर, विविध दुर्धर रोगांवर उपचार केले जातात.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबीर यशस्वीतेसाठी सर्जन डॉ. विजय गवळी, वर्षा गवळी, डॉ. महेश मेथा, डॉ. प्रशांत गायकवाड, अस्मिता तांबडे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व वैद्यकीय अधिकारी, म्हसळा, मेंदडी, खामगांव, आंबेत आशा आरोग्य कर्मचारी यांच्या सहकार्यातून शिबीर यशस्वी झाले.

## जंगल संपत्तीच्या ऱ्हासामुळे रानमेवा दुर्मिळ

**। खांब । वार्ताहर ।**



जंगल संपत्तीच्या ऱ्हासामुळे उन्हाळ्याच्या दिवसात तयार होणारा व प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा रानमेवा मिळविण्यासाठी फार मोठी धडपड करावी लागत आहे. वाढते औद्योगिककरण व शहरीकरणामुळे जंगलाची बेसुमार कत्तल केली जात आहे. तर, अनादी काळापासून मानवाने इंधन व घरगुती वापरासाठी जंगल संपत्तीची लूट चालविली आहे. त्यातच भरीस भर म्हणून जंगलात लावले जाणारे वणवे यामुळे दिवसेंदिवस जंगलांची संख्या कमी कमी होऊ लागल्याने त्याचा परिणाम जंगल संपत्तीवर होऊ लागला आहे. जंगलाच्या आश्रयाला व प्रत्यक्ष जंगलात राहणाऱ्या बहूतांश लोकांचा उदरनिर्वाह हा जंगलावरच अवलंबून असल्याने जंगल संपत्तीच्या ऱ्हासाचे परिणाम त्यांनाही भोगावे लागत आहेत.

ऊन्हाळ्यात जंगल भागात तयार होणारे आंबे, काजू, फणस, करवंदे, जांभळे, फणस आदी रानमेवा मिळविण्यासाठी सद्यस्थितीत फार मोठी धडपड करावी लागत असल्याचे आदिवासी भगिनींकडून सांगण्यात आले आहे. तर, सततची होणारी वृक्षतोड व जंगलात लावले जाणारे वणवे याचाही परिणाम रानमेव्यावर होऊ लागल्याने रानमेवा मिळण्याचे प्रमाणही कमी झाले असून रानमेवा मिळविण्यासाठीची धडपडही फार मोठी वाढली असल्याचे सांगितले आहे.

## वीस वर्षांनंतर माजी विद्यार्थी एकत्र

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

वीस वर्षांनंतर पाताळगंगा हायस्कूलचे विद्यार्थी व्हाट्सअपच्या माध्यमातून गगनगिरी मठात एकत्र आले. विशेष म्हणजे हे विद्यार्थी २००० सालापासून इयत्ता पाचवीच्या वर्गात होते. ते सर्व विद्यार्थी १४ मे रोजी एकत्र आले होते. त्यातील कोणी शिक्षक, उद्योजक, डॉक्टर, वकील, मॅनेजर अशा विविध पदावर कार्यरत आहेत. यावेळी इयत्ता पाचवीपासून दहावीपर्यंत च्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. सर्वांनी एकत्रित स्नेहभोजन करत पुन्हा भेटूया या असे सांगून निरोप घेतला.



## शेती मशागतीच्या कामाला वेग

**। तळा । वार्ताहर ।**



बळीराजाने आपल्या शेतात मान्सूनपूर्व शेती मशागतीच्या कामाला सुरुवात केली आहे. यंदा मान्सून लवकर येण्याची चिन्हे दिसू लागली असल्याने रणरणत्या उन्हात मशागतीचा वेग घेतला असल्याचे चित्र दिसून येत आहे. नदी, धरणाच्या पाण्यावर असणारी उन्हाळी शेती तयार होत असून कोरडवाहू शेतीत बळीराजा कामात गुंतला आहे. मान्सून पूर्णपणे महाराष्ट्रात येण्यास अजून पंधरा दिवसांचा अवधी बाकी असल्याने भाजवळ, कुंपणकाठी, बांध-बंदीस्ती पालापाचोळा जाळणे, झाडेझुडपे तोडणी, झाडलोट, शेतातील माती काढणे, गुरांचा वाडा साकारणी, कौलघराची साफसफाई वगैरेच्या कामाला वेग आला आहे. अनेक योजनांचा जाचक अटींमुळे लाभ मिळत नसला तरी भविष्याची चिंता करावी लागत असल्याने पारंपरिक शेती व्यवसाय टिकून ठेवण्यासाठी तालुक्यातील शेतकरी वर्ग प्रयत्नशिल असतो. वाढलेली महागाई, बी बियाणांचे वाढलेले दर, वाढलेली मजुरी यांचा विचार न करता आपला पारंपरिक शेती व्यवसाय जोपासण्यासाठी शेतीच्या कामात व्यस्त झालेला बळीराजा गावोगावी पहायला मिळत आहे.

## मालमत्तेच्या चौकशीची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील ग्रामपंचायती आता विकासाची केंद्रे असण्यापेक्षा ग्रामसेवकांसाठी चरण्याची कुरणे बनली आहेत. जास्त उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायती आपल्या हाती लागण्यासाठी उरण तालुक्यातील ग्रामसेवक आपापले गट सक्रिय करीत असल्याने हे ग्राम 'सेवक' की ग्राम 'भक्षक', असा प्रश्न जनतेला पडला आहे. काही हजारांचे पगारी नोकर असणाऱ्या अनेक ग्रामसेवकांनी करोडो रुपयांच्या मालमत्ता उभ्या केल्याने त्यांच्या मालमत्तांची चौकशी करण्याची मागणी गावागावातून होत आहे.

जेएनपीए बंदर व सिडको यांच्या माध्यमातून उरण तालुक्याचा झपाट्याने विकास झाला. ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनेक लहानमोठे प्रकल्प व निवासी वसाहती उभ्या राहिल्याने अनेक ग्रापंचायतींचे उत्पन्न हजारातून लाखांच्या घरात गेले. त्यामुळे या ग्रामपंचायतींमध्ये राजकारण्यांच्या सत्ता संपादनाची स्पर्धा सुरू झाली.अनके अनाडी पुढारी पैशाच्या बळावर ग्रामपंचायतीमध्ये सत्तेत बसले. पण सत्ता कशी चालवायची याचे त्यांना ज्ञान नसल्याने अनेक श्रीमंत ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसेवक सत्ता सूत्रे हलवू लागले आहेत.

उरण तालुक्यातील क्रिम ग्रामपंचायती काही ठराविक ग्रामसेवकांनी आपली जहागिरी असल्याप्रमाणे ताब्यात ठेवल्या आहेत. या ग्रामपंचायतींमध्ये दरवर्षी लाखोंचा गैरव्यवहार होत आहेत. त्याबाबत उरण पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे अनेक तक्रारी करूनही ग्रामसेवकांना नेहमीच अभय मिळाले असल्याची खंत संबंधित ग्रामपंचायतींमधील नागरिकांनी व्यक्त केली आहे. तरी उरण तालुक्यातील ग्रामसेवकांच्या मालमत्तेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी तालुक्यातील जनतेकडून होत आहे.

## संतोष निगडे यांना पितृशोक

**रेवदंडा :** संतोष निगडे यांचे वडिल चंद्रकांत गणपत निगडे यांचे मंगळवारी (दि.२१) वयाच्या ७८ व्या वर्षी सुधागड तालुक्यातील शिळोशी येथील निवासस्थानी निधन झाले.



त्यांच्या प्रश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंड, बहिणी असा परिवार आहे. त्यांचे दहावे गुरूवारी (दि.३०) श्री क्षेत्र उध्दर रामेश्वर येथे सकाळी दहा वाजता, तर तेरावे रविवारी (दि.२) जुन रोजी त्यांचे निवासस्थानी शिळोशी येथे करण्यात येणार आहेत.

## जलपर्णीमुळे उल्हास नदीचे प्रदूषण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत-कल्याण रस्त्यावर असलेल्या नेरळ ग्रामपंचायतीच्या मालकीचे असलेल्या ब्रिटिशकालीन धरणाच्या पाण्यावर जलपर्णीचे पांघरूण घातल्याचे चित्र दिसून येत आहे. या जलपर्णीमुळे तलावातील पाणी दूषित झाले असून नेरळ ग्रामपंचायतीने तलावातील जलपर्णी काढण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी करीत आहेत.

नेरळ ग्रामपंचायतीकडून गेली दोन वर्षे तलावातील गाळ माती काढण्याची कार्यवाही होत आहे. मात्र, मुबलक पाणी असल्याने एप्रिलमध्ये चांगला पाणीसाठा तेथे असतो. यावर्षी या पाण्यावर जलपर्णींनी मुक्काम केला आहे. त्याचवेळी जलपर्णी वाढल्याने पाण्यात अंघोळी करण्यासाठी येणाऱ्या जनावरांचे हाल झाले आहेत. त्यांना जलपर्णीच्या थरामुळे तलावातील पाणी जनावरांना पिता येत नाही. या तलावातील पाण्यावर निर्माण झालेल्या जलपर्णी पावसाळ्याआधी काढण्यात आल्या नाही तर या जलपर्णी पावसाच्या पाण्यासोबत उल्हास नदी वाहत जाऊन उल्हासनदीचे प्रदूषण वाढवित असतात. परंतु, या तलावामधील जलपर्णी बाजूला काढण्याऐवजी कोणीतरी तलावातील पाणी थेट नदीत सोडून दिले. हे पाणी जलपर्णीसह उल्हास नदीत सोडण्यात आल्याने पर्यावरण प्रेमी संतप्त झाले आहेत. ठाणे जिल्ह्याची जीवन वाहिनी समजल्या जाणाऱ्या उल्हास नदीचे पाणी प्रदूषित करण्यात नेरळ ग्रामपंचायतीचे ब्रिटिश कालीन तलाव कारणीभूत ठरले आहे.



## शासनाकडुन नुकसानभरपाई भेटण्यासाठी प्रयत्न



**। कर्जत । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने बरेच नुकसान केले. यामध्ये प्रामुख्याने विजेचे खांब कोसळल्याने अनेक गावांमधील वीजप्रवाह खंडीत झाला आहेत. पोशीर तसेचे शेलु ग्रामपंचायत भागातील अनेक ग्रामस्थांनी सुधाकर घारे यांना फोन करुन आपल्या अडचणी सांगीतल्या. त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता घारे यांनी घटनास्थळी भेटी देऊन झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. यावेळी घारे यांनी ठरावीक कुटुंबाना तात्काळ वयक्तिक मदत केली. तसेच, झालेल्या नुकानीची शासनाकडून भरपाई मिळावी यासाठी त्वरीत पंचनामे करण्याची विनंती शासकिय अधिकाऱ्यांना केली. विजप्रवाह खंडीत झाल्याने अनेक कामे ठप्प पडली आहेत. त्यामुळे त्याच्यावर लवकरात लवकर काम करण्याच्या सुचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून दिल्या.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३
- टायपिंग आणि झेरॉक्स करीता मुले मुली पाहिजेत संपर्क - ९९२२५८२५८०
- अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# गोद नदीवरील पुलाचे काम रखडले

### ■ दोन वर्षांनंतरही कामाला गती नाही ; पावसाळ्यात प्रवाशांच्या जीवाला धोका

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

**मुंबई-गोवा महामार्गावरील कळमजे फाट्यावर असणारा गोद नदीवरील पूल दिवसेंदिवस कमकुवत होत असल्याने पावसाळ्यात या नदीला पूर येतो. त्यामुळे या महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांना धोका होण्याचा संभव आहे. हा पूल कमकुवत असल्याने दरवर्षी अतिवृष्टीत शासनाकडून महामार्गावरील वाहतूक बंद केली जाते. मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्ग म्हणून निजामपूर मार्गे वाहतूक सुरु ठेवावी लागते. पावसाळा जवळ आल्याने या पुलाचा संभाव्य धोका लक्षात घेऊन शासनाने उपाययोजना आखणे गरजेचे होते. मात्र, तसे होताना दिसत नाही.**



मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव जवळ कळमजे गावाच्या फाट्यावर गोद नदी असून या नदीवर ब्रिटीश कालीन पूल बांधण्यात आला होता. या पुलाचे बांधकाम पूर्ण दगडात असून हा पूल दिवसेंदिवस कमकुवत होत आहे. पावसाळ्यात अतिवृष्टीत या नदीला मोठा पूर येतो, त्यावेळी शासन या पुलावरून येण्या-जाण्यासाठी वाहतूक बंद करते. हा पूल धोकादायक असल्याने विशेषतः पावसाळ्यात कोसळण्याची दाट शक्यता आहे. या पुलाची उंची कमी असून पावसाळ्यात या पुलाला पाणी लागते. या नदीवर शासनांनी प्रवासी, वाहनचालकांना सावधगिरीचा उपाययोजना म्हणून दोन्ही बाजूंनी स्ट्रीट लाईट बसवणे, तसेच सूचना फलक लावणे गरजेचे आहे. ते बसवले नसल्याने पावसाळ्यात या पुलावरून जाणाऱ्या वाहनांना धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

सावित्री नदी येथील दुर्घटनेच्या आठवणी लक्षात घेऊन या नदीवरील पूल तातडीने उभारण्याकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष चालवले आहे. येथील नवीन पुलाचे काम मंजूर होउन दोन वर्ष उलटली. हा नवीन पूल बांधण्यासाठी शासनाने निधी मंजूर केला असून या पुलाचे बांधकाम सुरू आहे. या पुलाची लांबी ३५ मीटर तर रुंदी १६ मीटर असून उंचीही वाढवली जाणार आहे. यासाठी ६ कोटी रुपये शासनाने मंजूर केले आहेत. मात्र, संबंधित ठेकेदाराने या कामाला म्हणावी तितकी गती दिलेली नाही. भविष्यात या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होईल यासाठी शासनाने या पुलाचे काम हाती घेऊन जलद गतीने पूर्ण करावे, अशी मागणी येथील नागरीक व प्रवासी वर्गाकडून होत आहे. परंतु, दहा दिवसांवर पाऊस आलेला असताना नदीच्या पायाभरणीचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे या पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी होण्याची अपेक्षा मावळली आहे.

# औद्योगिक क्षेत्रात सुरक्षेचा प्रश्‍न कायम !

**। माणगाव । वार्ताहर।**

नव्याने निर्माण होणाऱ्या आद्योगिक क्षेत्राला सुरक्षा देण्याच्या दृष्टीने कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉं. पक्षाच्या सरकारने गृहमंत्री कै. आर. आर. पाटील हे असताना त्यांनी राज्यातील औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र नवीन पोलीस ठाणे उभारण्याची घोषणा केली होती. महाड तालुक्यातील बिरवाडी, रोहा तालुक्यातील धाटाव व कोलाड येथे स्वतंत्र पोलीस ठाणे कार्यरत आहे. मात्र, माणगाव तालुक्यातील औद्यागिक क्षेत्रात झपाट्याने वाढत असलेल्या विळे-भागाड औद्यगिक वसाहतीत अद्यापही स्वतंत्र पोलीस ठाण्याची इमारत उभारली नसल्यामुळे या भागातील गुन्हेगारांना दिवसेंदिवस रान मोकळे झाले असून येथील सुरक्षेतेचा प्रश्‍न चव्हाट्यावर येत आहे. या औद्योगिक क्षेत्रात विविध घटना व दुर्घटना घडत आहेत. माणगाव तालुका हा भौगोलिक दृष्ट्या मोठा असल्याने स्वतंत्र पोलीस ठाण्याची गरज आहे. त्यामुळे शासन पुढचे पाउल कधी टाकणार? असा सवाल नागरीकातून उपस्थित होत आहे.

तालुक्यातील झपाट्याने वाढ होत असलेल्या विळे-भागाड औद्यागिक क्षेत्रात विविध कंपन्यांनी आपली बांधकामाची कामे, काही कंपन्यांनी जमीन सपाटीकरणाची कामे तर काही कंपन्यांचे मालाचे उत्पादन सुरु झाले आहे. गेल्या २८ वर्षापूर्वी या भागातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने औद्यागिकीकरणासाठी काढून घेतल्या होत्या. त्या विकसित करण्यास कंपन्यांनी बराच कालावधी घालवला. त्यानंतर या भागातील नागरिकांनी आमच्या जमिनी परत करा, असा सूर काढताच शासन खडबडून जागे झाले. भाजप शिवसेना युतीच्या सरकारमधील उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी ज्या उदयोजाकांनी जमिनी उद्योगासाठी घेतल्या. मात्र त्याठिकाणी उद्योग उभारले नसतील तर त्या शासन परत घेणार, असा इशारा देताच काही उद्योजकांनी कंपन्या उभारणीचे काम हाती घेतले होते.

विळे-भागाड या नव्याने सुरु झालेल्या औद्यागिक क्षेत्रात विविध कंपन्यात काम करण्यास जिल्हा व जिल्ह्याबाहेरून नोकरीसाठी तसेच अन्य राज्यातून कामगार मोठ्या संख्येने या भागात कामानिमित्त आले. तसेच, या कंपन्यात चोऱ्या व घरफोड्या होण्याचे प्रमाण वाढले आहे. माणगाव तालुका पोलीस ठाण्यांतर्गत रवाळजे येथे १९८२ मध्ये धरणाचे काम सुरु असताना या भागात मोठ्या प्रमाणात मजूर व नोकर आले होते. त्यामुळे शासनाने याचा विचार करून पोलीस दूरक्षेत्राची इमारत उभारून पोलीस कर्मचारी नेमले. या धरणाचे काम ३२ वर्षापूर्वी झाले. त्यानंतर येथील कामगारही निघून गेले, तरीही या ठिकाणचे पोलीस कर्मचारी तेथेच काम करत आहेत. हे पोलीस दूरक्षेत्र एका बाजूला असून, त्याचा उपयोग आजूबाजूच्या गावांना होत नाही.

**पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटी ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यम शाळा, चिरनेर मु.पो.- चिरनेर, ता.उरण, जि. रायगड**
**वंचित व दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांसाठी** R.T.E. 25%
**आरक्षणांतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू**
**शैक्षणिक वर्ष सन-२०२४ २०२५**
**इयत्ता- १ली साठी**

प्रवेश संख्या वर्गानुसार २५% जागा.- (१४ जागा)
कालावधी- १७ मे २०२४ पासून ३१ मे २०२४ पर्यंत
आवश्यक कागदपत्र वंचितसाठी :- १) जन्माचा दाखला २) आधारकार्ड ३) जातीचा दाखला ४) घरपट्टी ५) पासपोर्ट साईज फोटो
आवश्यक कागदपत्र दुर्बलसाठी (open) :- १) जन्माचा दाखला २) आधारकार्ड ३) सन २०२१-२२ किंवा २०२२-२३ चे एक लाखापेक्षा कमी असलेला उत्पन्नाचा दाखला ४) घरपट्टी ५) पासपोर्ट साईज फोटो
सूचना :- पालकांनी खालील साईटवर ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे.
http/rte 25% admission.maharashtra.gov.in अधिक माहितीसाठी इंग्रजी माध्यम शाळा कार्यालयात संपर्क साधा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटी**
**ता. उरण, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक आप्पा सखाराम आगज वगैरे ४ रा. आंबोट, ता.कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

मौजे आंबोट, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १६ | २ ब | ०-४४-०० पो.ख. ०-०१-३० एकूण ०-५६-३० | २-९५ |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदूंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.
दिनांक : २३/०५/२०२४

अशिलांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रविण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं.८२३७१०१७१८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, येथील गट नंबर ६९, एकूण क्षेत्र ०- १६-०० हे. आर., आकार ०.४५ रू. पै. या भातशेती मिळकतीपैकी क्षेत्र ०-०८-०० हे. आर. ही मिळकत तसेच या मिळकतीतील ग्रुप ग्रामपचांयत आवास मालमत्ता क्र. १७४२ क्षेत्र, ४६.४७ चौ.मी. दगड, विटा, सिमेंटचे पक्के घर, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अभिजीत प्रभाकर राणे व अभिलाषा अभिजीत राणे दोघेही रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस फरोक्त साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २२/०५/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्‍वर्य ज्वेल कलेक्शन**
**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटिंग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## मुरुड जंजिरा नगरपरिषद

लोकमान्य टिळक रस्ता, मुरुड-जंजिरा, जि. रायगड
पि.को.नं. ४०२ ४०१ दूरध्वनी : (०२१४४) २७४०२२/२७४७८९/२७४७६९,
**मुरुड जंजिरा नगरपरिषद जि.रायगड**
**जाहीर प्रकटन**

मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील सर्व मिळकतधारक व रहिवाशी यांना या जाहीर प्रकटना द्वारे कळविण्यांत येते की, चालू सन २०२४ चे पावसाळी मोसमामध्ये संभाव्य अतिवृष्टी, पूर, वादळ तसेच जमिन खचणे, भुस्खलन, दरडकोसळणे, धोकादायक झाडे इत्यादी नैसर्गिक आपत्ती मुळे होणारी जिवीत व वित्तहानी टाळण्यासाठी ज्या मिळकती/इमारती धोकादायक झाल्या आहेत, येथे ज्या इमारती डोगर उतरावर आहेत, खाडीच्या लगतच्या भागात आहेत अशा इमारती अथवा मिळकतीमध्ये कोणीही वास्तव्य करू नये तसेच अशा इमारतीच्या किंवा मिळकतींच्या संबंधीत घरमालकांनी/भोगवटाधारकांनी आपल्या कुटुंबाची तसेच शेजारच्या रहिवाश्यांची संभाव्य जिवीत व वित्तहानी होऊ नये या दृष्टीने धोकादायक इमारती/मिळकतींचा धोकादायक भाग तातडीने उतरवून घेवून धोका नष्ट करावा. तसेच धोकादायक झाडांचा योग्यतो बंदोबस्त करावा. अशा धोकादायक इमारती/मिळकती संदर्भात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये ही नोटीस समजण्यांत यावी. व त्यांनी वरिल नमुद केले प्रमाणे तात्काळ कार्यवाही करुन नगरपरिषदेस सहकार्य करावे ही विनंती.

म्यु जा क्र २७४/आ.व्य./२०२४-२५
मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय
मुरुड जंजिरा, जि.रायगड
दिनांक :-२०/०५/२०२४

सही/-
**(श्री. पंकज अनिल भुसे)**
मुख्याधिकारी
मुरुड जंजिरा नगरपरिषद

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे अरवंद ता. कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. अरवंद ता. कर्जत जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हिस्सा नं | क्षेत्र. (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| सुब्रमनियम रामकृष्णन कुवापाडी | २० | २/अ/१ | एकुण क्षेत्र ०-५७-०० या पैकी ०-१४ -०० | १-१६ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार पोटगी चार्ज बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्हाकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन २१ (एकविस) दिवसाचे आत नोंदवावी वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२३/०५/२०२४
मो.नं.८००७५३७६५६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

( तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड )
ज. म. र अर्ज ७८/२०२४

**जाहिर नोटीस**

शबिस्ता फरीदा जमादार,
रा. मु. पो. बाजारपेठ, — अर्जदार
ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत शिघे, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार शबिस्ता फरीद जमादार, यांचा जन्म दिनांक १०/०६/१९७९, रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे शिघ्रे, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत शिघ्रे कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार शबिस्ता फरीद जमादार, हिचा दिनांक १०/०६/१९७९, रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि.२५/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता २१/०५/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

( तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज. म. र अर्ज ८३/२०२४

**जाहिर नोटीस**

ईकबाल उमर कासकर,
रा. मु. पो. चोरढे, — अर्जदार
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चोरढे, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार ईकबाल उमर कासकर, यांचा जन्म दिनांक ०२/०३/१९५३ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे चोरढे, ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत चोरढे कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार ईकबाल उमर कासकर, दिनांक ०२/०३/१९५३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.२५/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.
दिली.
यांचा

आज ता. २१/०५/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरूड- जंजिरा,**

## जाहिर नोटीस

कर्जत नगरपरिषद, जि. रायगड, ४१०२०१
जावक क्रमांक/कम्प/बांधकाम विभाग/२०५/२०२४-२५, दिनांक २२/०५/२०२४

कर्जत नगरपरिषद हद्दीमधील सर्व रहीवासी मिळकत धारकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे/भुसख्खलनामूळे ठिकठिकाणी यापूर्वी मोठ्या प्रमाणावर जिवीत वा वित्तहानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. कर्जत नगरपरिषद हद्दीतीमध्ये काही धोकादायक इमारती घरे आहेत तसेच काही नागरीकांनी डोंगर उतारावर परे बांधलेली आहेत कोकण विभागात अतिवृष्टी होत असूनही भूसख्खलनही मोठ्या प्रमाणात होत असते. कर्जत नगरपरिषद कार्यक्षेत्रामध्ये ही डोंगराळ भाग जास्त आहे. त्यामुळे कर्जत शहरामध्ये अतिवृष्टी होवून काही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९३ अ मधील तरतुदीनुसार जाहीर आवाहन करणेंत येत आहे की, नगरपरिषद हद्दीतील अतिधोकादायक झालेल्या सर्व शासकीय व खाजगी मालकीचे इमारतीचे तसेच ज्या इमारतीच्या बांधकामांचा कालावधी ३० वर्षापेक्षा जास्त झाला आहे, अशा सर्व शासकीय व खाजगी इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घ्यावे व सदरच्या इमारती/घरे राहण्यास योग्य असल्याची खातरजमा करावी व तसा अहवाल कर्जत नगरपरिषद कार्यालयात सादर करावा.

तसेच जमीन खचणे, भुसख्खलन इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जिवीत /वित्तहानी टाळण्यासाठी ज्या मिळकती धोकादायक इमारती/घरे धोकादायक कड्यांच्या बाजूला अथवा डोंगर उतारावर अथवा दरड कोसळण्याची शक्यता असणाऱ्या ठिकाणी असल्यास अथवा अशा इमारतींचा काही भाग धोकादायक झालेला असल्यास, अशा इमारतीमध्ये अथवा मिळकतीमध्ये कोणीही वास्तव्य करू नये. तसेच अशा इमारतींच्या किंवा मिळकतीच्या संबंधित घरमालकांनी/भोगवटाधारकांनी आपल्या कुटुंबियांची तसेच शेजारच्या रहिवासीयांची-जिवीत/वित्तहानी होऊ नये या दृष्टिने धोकादायक इमारतींचा/मिळकतींचा धोकादायक भाग तातडीने काढून टाकून त्या दुरुस्त कराव्यात. तसेच ज्या इमारती/घरे दुरुस्ती करून राहण्यायोग्य नाहीत तश्या इमारतीं/घरे तात्काळ खाली कराव्यात व तिथे राहणाऱ्या सदस्यांनी स्वतःच्या राहण्याची पर्यायी व्यवस्था करावी. अशा धोकादायक इमारतींमध्ये/मिळकतींमध्ये जर कोणी वास्तव्य केले व त्यामुळे कोणत्याही प्रकारची जिवीत/वित्तहानी झाल्यास त्यास कर्जत नगरपरिषद जबाबदार राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

सही/-
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे अरवंद ता. कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. अरवंद ता. कर्जत जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हिस्सा न. | क्षेत्र. (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| ललित चंदुलाल ओसवाल | २० | २/अ/१ | एकुण क्षेत्र ०-५७-०० या पैकी ०-१४-०० | १-१६ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार पोटगी चार्ज बक्षिस वहीवाट इजमेंट बोजा तारण,वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्हाकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन २१ (एकविस) दिवसाचे आत नोंदवावी वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२३/०५/२०२४
मो.नं.८००७५३७६५६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज. म. र अर्ज ८०/२०२४

**जाहिर नोटीस**

मजिद हुसेनमिया दळवी,
रा. मु. बोर्ली, पो. बोर्ली मांडला, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार मजिद हुसेनमिया दळवी, यांचा जन्म दिनांक ०७/०४/१९५६ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे बोर्ली, ता. मुरुड जंजिरा, जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत बोर्ली कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार मजिद हुसेनमिया दळवी, यांचा दिनांक १७/११/१९५२, रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.२५/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.२१/०५/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज. म. र अर्ज ८४/२०२४

**जाहिर नोटीस**

मन्सूर उमर कासकर,
रा. मु. पो. चोरढे, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चोरढे, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार मन्सूर उमर कासकर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६०, रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे चोरढे, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत चोरढे कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम यांचा १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार मन्सूर उमर कासकर, दिनांक ०२/०३/१९५३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.२५/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.
दिली.
आज ता. २१/०५/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी
कळावे.

**सही/-**
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकती हया खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : काकल, ता. माणगांव, जि. रायगड येथील मिळकती**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हे आर | आकार रु. पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| मिनाक्षी मिलिंद रणदिवे | ७५/२४/ब | ०-२९-०० | ०=१७ | खालसा |
| | ७५/८ | ०-१९-०० | ०=११ | खालसा |
| | ३९/१ | ०-८१-१० पैकी क्षेत्र हे ०-५५-१० आर | ७=७२ ५=३८ | खालसा |
| | ७५/१० | ०-०३-०० | ०=०६ | खालसा |
| | ७५/१९ | ४-५७-०० पैकी क्षेत्र हे १-९०-३० आर | १=५१ ०=८४ | खालसा |
| | ७५/१३ | ०-०८-०० | ०=०५ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा, कबजा वहिवाट वचनचिठ्ठी दावा दरखास्त वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. २३/०५/२०२४

सही/-
**ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४था मजला.
साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ, रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा. क. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की.

आमचे अशिल श्री. योगेश राम म्हसकर व इतर १ यांनी मौजे - पेण, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची सदनिका मिळकत तिचे मालक श्री. कन्हैयालाल व इतर १ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

पेण नगरपरिषदेच्या हद्दीतील शंकरनगर पेण येथील सर्व्हे नं. ३१३ब या मिळकतीवर उभारण्यात आलेल्या जुनी ‘ठुले रेसिडेन्सी’ नवीन ‘स्वराज्य रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पेण’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारती मधील तिसऱ्या मजल्यावरील, निवासी सदनिका क्र. ३०७, क्षेत्र ६७८.०० चौ. फुट (बिल्टअप) व ३९६.७५ (कारपेट).

वरील प्रमाणे सदनिका मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.

तरी वरील सदनिका मिळकतीत अथवा सदर सदनिका मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार, वहिवाटीचा हक्क, ताबा, भाडेपट्टा, मृत्यूपत्र बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती आणि त्याच्या हरकती नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर सदनिका मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर सदनिका मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक: २३/०५/२०२४

सही/-
**ॲडव्होकेट, मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता-शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस् मुद्रे (बुद्रुक),
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज. म. र अर्ज ७९/२०२४

**जाहिर नोटीस**

मजिद हुसेनमिया दळवी,
रा. मु. पो. बोर्ली, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत बोली, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांची बहीण पाकीजा हुसेनमिया दळवी, यांचा जन्म दिनांक ३०/०६/१९७५ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे बोर्ली, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत बोर्ली, कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांची बहीण पाकीजा हुसेनमिया दळवी, यांचा दिनांक ३०/०६/१९७५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.२५/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही, असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता २१/०५/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

( तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड )
ज. म. र अर्ज ७७/२०२४

**जाहिर नोटीस**

शबिस्ता हिफजान उलडे,
रा. मु. बाजारपेठ मुरूड, — अर्जदार
ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड.
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत विहूर,
ता. मुरुड, जि. रायगड. — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचे पति हिफजान कमरूद्दीन उल्डे, यांचा जन्म दिनांक २२/०२/१९७२ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे विहूर, ता. मुरूड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांचे पति हिफजान कम रूद्दीन उल्डे, यांचा दिनांक २२/०२/१९७२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.२५/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता २१/०५/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**( रोहन शिंदे )**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा,**

## निवडक

### नदालचा प्रवेश अनिश्चित

**पॅरिस :** लाल मातीचा बादशहा राफेल नदाल आपल्या हुकमी रोलँड गॅरोसमध्ये सोमवारी सरावासाठी आला आहे; परंतु येत्या रविवारपासून सुरू होणाऱ्या फ्रेंच ओपन स्पर्धेत खेळू शकणार आहे की नाही, याची तो चाचणी घेणार आहे. लाल मातीच्या कोर्टवर होणाऱ्या फ्रेंच ओपन स्पर्धेत नदालने सर्वाधिक १४ वेळा अजिंक्यपद मिळवलेले आहे. ३७ वर्षीय नदाल आपले प्रशिक्षक आणि माजी टेनिसपटू कार्सोल मोया तसेच काही सहकाऱ्यांसह तो फिलिप चॅटियर कोर्टवर सोमवारी दुपारी आला.

### त्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद

**क्लॉला लंपूर :** भारताच्या त्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी आजपासून सुरू झालेल्या मलेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत म हिला दुहेरीत दुसरी फेरी गाठली. त्यांनी सलामीच्या सामन्यात तैपेईच्या हुआंग यू हून आणि लियांग तिंग यू यांचा सहज पराभव केला. राष्ट्रकुल स्पर्धे तील ब्राँझपदक विजेत्या त्रीसा आणि गायत्री यांना या स्पर्धेत सातवे मानांकन आहे. त्यांनी जागतिक क्रमवारीत १०४व्या स्थानावर असलेल्या तैपेईच्या या जोडीचा २१-१४, २१-१० असा पराभव केला.

### सराव सामना न्यूयॉर्कमध्ये

**नवी दिल्ली :** आसीसीने नुकतेच टी-२० वर्ल्ड कप २०२४ च्या सराव सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले. २७ मे ते १ जून या कालावधीत अमेरिका, त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे वर्ल्ड कपचे सराव सामने खेळवले जाणार आहेत.वर्ल्ड कपपूर्वी एकूण १६ सराव सामने होणार आहेत. ज्यामध्ये टीम इंडिया आणि बांगलादेश यांच्यात शेवटचा सराव सामना होणार आहे. हा सामना १ जून रोजी होणार आहे. मात्र या सामन्याचे ठिकाण यापूर्वी जाहीर करण्यात आले नव्हते.

### ॲथलेटिक्स स्पर्धा

**जपान :** विद्यमान ऑलिंपिक विजेत्या भारताच्या सुमित अंतिलने येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत एफ गटातील भालेफेकीतील आपले विजेतेपद कायम राखले. तर थांगावेलू मरियप्पन आणि एकता भायन यांनीही आपापल्या गटात सुवर्णपदके जिंकली, त्यामुळे भारताने तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे..स्पर्धेच्या पाचव्या दिवशी भारतीयांनी आज एकूण पाच पदकांची कमाई केली. भारताची एकूण पदक संख्या १० (४ सुवर्ण, ४ रौप्य आणि २ ब्राँझ) इतकी झाली आहे.

### पाकची डोकेदुखी वाढली

**कराची :** ट्वेंटी-२० विश्वचषकाच्या तोंडावर पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात चार साम न्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळवली जात आहे. बुधवारपासून या मालिकेला सुरुवात होत आहे. पण, सलामीच्या सामन्यापूर्वी शेजाऱ्यांची डोकेदुखी वाढणार आहे. कारण संघाचा वेगवान गोलंदाज हसन अली संपूर्ण मालिकेला मुकणार आहे. पाकिस्तानच्या संघ व्यवस्थापनाने हसन अलीचा काउंटी क्रिकेटमधील त्याचा करार कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

# कोलकाता दिमाखात अंतिम फेरीत

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

**केकेआरने स्टार्कच्या शानदार गोलंदाजीनंतर व्यंकटेश –श्रेयसच्या अर्धशतकांच्या जोरावर क्वालिफायर–१ सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा ८ गडी राखून पराभव केला. या विजयासह कोलकाता नाईट रायडर्सने अंतिम फ ेरीत प्रवेश केला आहे. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने राहुल त्रिपाठीच्या ५५ धावांच्या जोरावर १९.३ षटकांत १५९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात केकेआरने श्रेयसच्या नाबाद ५८ धावा आणि व्यंकटेशच्या नाबाद ५१ धावांच्या खेळीच्या जोरावर १३.४ षटकांत दोन गडी गमावून १६४ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला.**

कोलकाता नाईट रायडर्सने अशा प्रकारे क्वालिफायर-१ मध्ये अपराजित राहण्याचा विक्रम कायम ठेवला आहे. त्याचबरोबर आयपीएल २०२४ च्या अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला संघ ठरला. पराभवानंतरही हैदराबादचा संघ स्पर्धेबाहेर झाला नसून त्यांना विजेतेपदाच्या लढतीत प्रवेश करण्याची आणखी एक संधी मिळणार आहे. हैदराबादचा आता शुक्रवारी क्वालिफायर-२ मध्ये बुधवारी आरसीबी आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील एलिमिनेटरच्या विजेत्याशी साम ना होईल. क्वालिफायर-२ चा विजेता संघ रविवारी चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर होणाऱ्या विजेतेपदाच्या लढतीत केकेआरशी भिडणार आहे.

हैदराबादने दिलेल्या १६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सुनील नरेन आणि रहम ानउल्ला गुरबाज यांनी केकेआरला दमदार सुरुवात करून दिली. दरम्यान, चौथ्या षटकात गुरबाज १४ चेंडूत २३ धावा काढून बाद झाला. या दमदार सुरुवातीच्या जोरावर कोलकाता नाईट रायडर्सने पॉवरप्ले षटकांत १ गडी गमावून ६३ धावा केल्या होत्या. पॉवरप्ले संपल्यानंतरही केकेआरचा रनरेट कमी झाला नाही. १० षटकांच्या



अखेरीस कोलकाताने २ गडी गमावून १०७ धावा केल्या होत्या आणि संघाला विजयासाठी ६० चेंडूत ५३ धावा करायच्या होत्या. दरम्यान, व्यंकटेश अय्यरने २८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले, तर कर्णधार श्रेयस अय्यरने २३ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. व्यंकटेश अय्यर आणि श्रेयस यांच्यातील ९७ धावांच्या नाबाद भागीदारीमुळे कोलकाता नाईट रायडर्सचा ८ गडी राखून विजय निश्चित झाला. सनरायझर्स हैदराबाद संघाकडून गोलंदाजी करताना पॅट कमिन्स आणि टी नटराजनने प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ट्रॅव्हिस हेड पहिल्याच षटकात शून्य धावांवर बाद झाल्याने सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खूपच खराब झाली. अभिषेक शर्माही दुसऱ्या षटकात ३ धावा काढून बाद झाला. हेड आणि अभिषेकची खतरनाक जोडी बाद झाली. एसआरएचची अवस्था इतकी वाईट झाली होती की पॉवरप्ले ओव्हर्समध्ये टीमने ४५ धावांवर ४ विकेट गमावल्या. दरम्यान, राहुल त्रिपाठी आणि हेनरिक क्लासेन यांच्यात ६२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली आणि दोघांनीही धावगती सुधारली. दरम्यान, क्लासेन ११व्या षटकात ३२ धावा काढून बाद झाला.

त्रिपाठीसोबत अब्दुल समदही चांगलाच संपर्कात असल्याचे दिसत होते, मात्र १४व्या षटकात त्रिपाठी ५५ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. संघाची अवस्था इतकी बिकट होती की १५ षटकांत हैदराबादची धावसंख्या ८ विकेट्सवर १२५ धावा होती. यानंतर कर्णधार पॅट कमिन्स कसा तरी डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पॅट कमिन्स आणि विजयकांत यांच्यात शेवटच्या विकेटसाठी ३३ धावांची भागीदारी झाली होती, मात्र २० व्या षटकात कमिन्स ३० धावांवर बाद झाला. यासह सनरायझर्स हैदराबादचा डाव १५९ धावांवर गारद झाला. त्यांच्या सात फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. केकेआरसाठी मिचेल स्टार्कने सर्वाधिक विकेट घेतल्या, ज्याने पॉवरप्लेमध्येच ३ विकेट्स घेतल्या. स्टार्कनंतर वरुण चक्रवर्तीने फिरकीचे जाळे विणत २ महत्त्वाच्या २ विकेट्स घेतल्या.

## अर्जुन पोहचला दत्ताच्या चरणी

**मुंबई :** इंडियन प्रीमियर लीग २०२४ स्पर्धेतील मुंबई इंडियन्सची कामगिरी फारशी चांगली झालेली नाही. त्यांना प्लेऑफमध्येही प्रवेश करण्यात अपयश आले. दरम्यान, मुंबईचे या स्पर्धेतील आव्हान संपल्यानंतर आता खेळाडू आपापल्या घरी परतले आहेत. यादरम्यान, सचिन तेंडुलकरचा मुलगा आणि मुंबई इंडियन्सचा अष्टपैलू अर्जुन तेंडुलकर कोल्हापूरला पोहचला आहे. त्याने यावेळी कोल्हापूरच्या नरसोबा वाडीतील दत्त महाराज मंदिरालाही भेट देत दर्शन घेतले. तो दत्त महाराजांच्या चरणी नतमस्तक झाल्याचा व्हिडिओही सध्या व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये दिसते की अर्जुन श्रद्धेने मंदिरात पाया पडत आहे. तसेच मंदिराच्या आवारात त्याला पाहण्यासाठी लोकंही जमा झालेली आहेत.अनेक रिपोर्ट्सनुसार नरसोबा वाडीतील दत्त महाराजांवर तेंडुलकर कुटुंबियांची श्रद्धा आहे. याआधीही सचिन आणि अर्जुन यांनी या मंदिरात येऊन दर्शन घेतले होते. अर्जुन तेंडुलकरला मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२४ साठी संघात कायम केले होते.

## पथिराणा बनला करोडपती

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमिअर लीगमध्ये यशस्वी संघाची चर्चा होते, तेव्हा चेन्नई सुपर किंग्स हे नाव नेहमी आघाडीवर पाहायला मिळाले आहे. महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली ने पाच जेतेपदं नावावर केली आहेत आणि अनेक युवा खेळाडूही घडवले आहेत. चेन्नईला यंदाच्या पर्वात साखळी सामन्यात गाशा गुंडाळावा लागला असला तरी ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील त्यांची नवी सुरुवात ही चांगली झाली. युवा गोलंदाज मथीशा पथिराणा याच्या गोलंदाजीने यंदाही प्रभावित केले.

ट्वेंटी-२० वर्ल्ड कप साठी त्याची श्रीलंकेच्या संघातही निवड झाली आणि त्यासाठीच त्याला आयपीएल २०२४ मधून लवकर मायदेशात परतावे लागले. पथिराणाने आयपीएल २०२४ मध्ये ६ सामन्यांत साठी १३ विकेट्स घेतल्या. २०२२ मध्ये १९ वर्षीय पथिराणाला चेन्नईने २० लाखांत करारबद्ध केले आणि आतापर्यंत २० सामन्यांत त्याने ३४ विकेट्स घेतल्या आहेत. श्रीलंकेचा महान गोलंदाज लसिथ मलिंगा याच्या गोलंदाजीच्या शैलीशी मिळतीजुळती शैली पथिराणाची आहे आणि डेथ ओव्हरमध्ये चेन्नई सुपर किंग्सने त्याचा चांगला वापर



करून घेतला. २०२३ च्या चेन्नई सुपर किंग्सच्या जेतेपदात पथिराणाचा (१९ विकेट्स) महत्त्वाचा वाटा होता. श्रीलंकेच्या १९ वर्षांखालील वर्ल्ड कप संघात (२०२० व २०२२) त्याने प्रतिनिधीत्व केले होते. आयपीएलमधील त्याची कामगिरी पाहता लंका प्रीमिअर लीग २०२४ साठी मोठी बोली लागली आहे.

पथिराणाला कोलंबो स्ट्रायकर्स संघाने सर्वाधिक १ कोटींची बोली लावून आपल्या ताफ्यात घेतले आहे. लंका प्रीमिअर लीगच्या इतिहासातील तो सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. या ऑक्शनसाठी ४२० खेळाडूंनी आपली नावे नोंदवली आणि त्यात १५४ लंकन खेळाडूंचा समावेश होता. मथीशा पथिराणाने १२ वन डे व ६ ट्वेंटी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत अनुक्रमे १७ व ११ विकेट्स घेतल्या आहेत.

# सचिन तेंडुलकरने घेतली रतन टाटा यांची भेट

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महान फलंदाज मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने उद्योगपती रतन टाटा यांच्यासोबतचा फोटो शेअर केला आहे. सध्या देशभरात लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत आहे. पाच टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडली असून, सचिन तेंडुलकर निवडणूक आयोगाचा राष्ट्रीय आयकॉन म्हणून मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करताना दिसत आहे. अशातच त्याने रतन टाटांसोबतच्या भेटीचा फोटो शेअर करताना एक लांबलचक पोस्ट लिहिली.



एक संस्मरणीय संवाद... मला श्री टाटा यांच्यासोबत वेळ घालवण्याची संधी मिळाल्याने मागील रविवार नेहमी आठवणीत राहील असा होता. आम्ही ऑटोमोबाईलवरील आमचे प्रेम, समाजाला परत देण्याची आमची बांधिलकी, वन्यजीव यांच्या रक्षणाची आवड आणि आमच्या प्रेमळ मैत्रीबद्दलच्या चर्चा केल्या. काही आठवणींना उजाळा दिला. टाटा यांच्यासोबत झालेली चर्चा अमूल्य असून, ही भेट एक वेगळाच आनंद देऊन गेली. हा दिवस नेहमीच हसतमुखाने लक्षात ठेवीन. सचिन तेंडुलकर आणि रतन टाटा यांच्या फोटोवर नेटकरी कमेंटच्या माध्यमातून प्रेमाचा वर्षाव करत आहेत. अनेकांनी सचिनने लिहिलेल्या कॅप्शनला दाद दिली.

### सचिनची गोलंदाजीतही कमाल

आपल्या फलंदाजीने भल्याभल्या गोलंदाजांना घाम फोडणारा सचिन गोलंदाजीतही कमी नव्हता. एकाच मैदानावर दोनदा पाच बळी घेणारा सचिन हा पहिला भारतीय गोलंदाज आहे. त्याने १९९८ मध्ये कोची येथे ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात पाच बळी घेण्याची किमया साधली होती. सचिन तेंडुलकर हा भारतासाठी वन डे सामन्यात बळी घेणारा सर्वात तरूण खेळाडू आहे. त्याने १७ वर्ष २२४ दिवसांचा असताना वन डे सामन्यात बळी पटकावला होता. सचिनने कसोटी, वन डे आणि ट्वेंटी–२० च्या एकूण ६६४ आंतरराष्ट्रीय सामन्यांतील ४१६ डावांत गोलंदाजी केली आहे.

## तेंडुलकरचा पुतळा जाळणार

### बच्चू कडूंनी साधला निशाणा

**अमरावती :** प्रहार संघटनेचे सर्वेसर्वा आणि आमदार बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा सचिन तेंडुलकरवर निशाणा साधला आहे. नुकतेच सचिन तेंडुलकरच्या एका बॉडीगार्डने आत्महत्या केली होती. बच्चू कडू यांनी सचिन तेंडुलकरच्या बॉडीगार्डने ऑनलाईन रम्मीच्या व्यसनापोटी आपलं जीवन संपवलं असा दावा केला आहे.

बच्चू कडू म्हणाले की, जो व्यक्ती आयुष्यभर सचिन तेंडुलकरची सुरक्षा करत होता. त्यानं आपले जीवन ऑनलाईन रम्मीमुळं आज संपवलं. याच ऑनलाईन गेमिंगची जाहिरात सचिन तेंडुलकर करतो. हे निषेध करण्यासारखं आहे. सचिनने ऑनलाईन रम्मीची जाहिरात करणं थांबवावं किंवा त्यानं भारत रत्न परत करावा. जर त्यानं असं केलं नाही तर आंदोलन करून त्याच्या पुतळ्याचं दहन करू, असे ते म्हणाले.

# स्वत:चा संघ तयार करणार

### महेंद्रसिंग धोनीची घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

धोनीने केलेल्या पोस्टमुळे चाहत्यांमधृये खळबळ उटाली आहे. धोनीने पोस्टच्या माध्यमातून म्हटले की, आता झेप घेण्याची वेळ आली आहे. जे महत्त्वाचे आहे ते करण्याची वेळ आली आहे. मी माझी स्वतःची टीम सुरू करत आहे. पण, धोनी त्याचा संघ कोणत्या आधारावर तयार करणार, त्याची रूपरेषा आणि पुढील मार्ग काय असेल याबाबत त्याने काहीच स्पष्ट केले नाही. खरे तर धोनीचे हे पेड प्रमोशन आहे.



भारतीय संघाचा माजी खेळाडू महेंद्रसिंग धोनी केवळ आयपीएलमध्ये खेळताना दिसतो. १५ ऑगस्ट २०२० रोजी त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केले. आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सच्या संघाचे कर्णधारपद सोडल्यानंतर माही निवृत्त होईल अशी अटकळ बांधली जात होती. आयपीएलच्या यंदाच्या हंगामातून चेन्नईचा संघ बाहेर पडला आहे. अशातच आता सर्वांच्या लाडक्या माहीने फेसबुकवर एक पोस्ट करत चाहत्यांना संभ्रमात टाकल्याचे दिसते.

धोनी भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात यशस्वी कर्णधार आहे. त्याच्या नेतृत्वात भारताने तीनवेळा आयसीसीचा किताब जिंकला आहे. धोनी कर्णधार असताना भारताला एक ट्वेंटी-२० विश्वचषक, एक वन डे विश्वचषक आणि एक चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकण्यात यश आले. शेवटच्या वेळी २०१३ मध्ये टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या रूपात आयसीसीचा किताब जिंकला होता. तेव्हापासून आजतागायत भारताच्या खात्यात ट्रॉफीचा दुष्काळ आहे.

# फ्रेझरसह शॉर्ट ऑस्ट्रेलियाच्या राखीव संघात

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

आयपीएलमध्ये दिल्ली संघातून खेळत धमाकेदार फलंदाजी करणाऱ्या जॅक फ्रेझर मॅकगर्कच्या कामगिरीची दखल क्रिकेट ऑस्ट्रेलियाने घेतली. येत्या ट्वेन्टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेसाठी जॅकसह मॅथ्यू शॉर्टची राखीव खेळाडू म्हणून निवड ऑस्ट्रेलिया संघाचे प्रशिक्षक अँड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी केली आहे.



२२ वर्षीय जॅक फ्रेझर यंदा पहिल्यांदा आयपीएलमध्ये खेळला. काही सामन्यानंतर त्याला अंतिम संघात खेळण्याची संधी मिळाली आणि त्यात त्याने अतिशय स्फोटक फलंदाजी केली. २३४च्या स्ट्राईक रेटने त्याने चार अर्धशतके केली. त्याने एकूण ३३० धावा फटकावल्या, यात ३२ चौकार आणि २८ षटकार मारले. म्हणजेच ३३० पैकी ३०२ धावा या त्याने चौकार आणि षटकारांनी केल्या.

फ्रेझर मॅकगर्क आणि शॉर्ट हे वेस्ट इंडीज आणि अमेरिकेतील परिस्थितीत वेगळे खेळाडू ठरू शकतील. फ्रेझरची आयपीएलम धील फलंदाजी अफलातूनच झाली आहे आणि मॅथ्यू शॉर्टला आम्ही मधल्या फळीतील फलंदाज म्हणून तयार केलेले आहे, असे मॅकडोनाल्ड यांनी सांगितले. मॅक्सवेल दुखापतीमुळे खेळू शकला नाही तर त्याच्या जागेवर शॉर्ट योग्य पर्याय ठरू शकेल. मॅक्सेवलप्रमाणे तो उपयुक्त फिरकी गोलंदाज आहे, असेही मॅकडोनाल्ड म्हणाले.

या विश्वकरंडक स्पर्धेसाठी आयसीसीने राखीव खेळाडू निवडण्यास मंजुरी दिली आहे; परंतु हे खेळाडू मुख्य संघातील खेळाडू दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर गेले तरच त्यांना अंतिम संघात खेळण्याची संधी मिळणार आहे. ऑस्ट्रेलिया संघातील खेळाडू (आयपीएलमध्ये खेळत असलेल्या खेळाडूंचा अपवाद वगळता) बुधवारी रवाना होत आहेत. स्पेन्सर जॉन्सन, झेव्हियर ब्रेटलेट या खेळाडूंनाही आम्ही सज्ज राहण्यास सांगितले आहेत. सध्या हे वेगवान गोलंदाज इंग्लंडमध्ये कौंटी क्रिकेट खेळत आहेत. विश्वकरंडक स्पर्धेसाठी आम्हाला गरज भासली तर त्यांनी लंडनहून वेस्ट इंडीजमध्ये येण्यास सांगण्यात येईल, असे मॅकडोनाल्ड यांनी सांगितले.

सूर हरपलेल्या ३७ वर्षीय सलामीवीर डेव्हिड वॉर्नरबाबत बोलताना मॅकडोनाल्ड यांनी चिंता नसल्याचे सांगितले. सध्या तरी आम्ही चिंता करत नाही. तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे. आयपीएलमध्ये दिल्ली संघातून तो अखेरचा सामना खेळू शकला नव्हता. संघ रचना करण्यासाठी त्याला अंतिम संघात स्थान मिळाले नव्हते त्याचा दुखापतीशी संबंध नव्हता. विश्वकरंडक स्पर्धेसाठी आमची पहिली पसंती वॉर्नरलाच असेल, असा विश्वास मॅकडोनाल्ड यांनी व्यक्त केला.

## ब्राव्हो अफगाण संघाचा गोलंदाज सल्लागार

**नवी दिल्ली :** जून महिन्यात अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये टी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे. या स्पर्धेसाठी टीम इंडियाशिवाय अनेक देशांनी आपले संघ जाहीर केले आहेत. १ जूनपासून सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी सर्व संघांनी तयारी सुरू केली आहे. यादरम्यान अफगाणिस्तान संघाने आपल्या संघासह ब्राव्होला संघाचा गोलंदाज सल्लागार म्हणून नेमले आहे.

अफगाणिस्तानने वेस्ट इंडिजचा माजी गोलंदाज ड्वेन ब्राव्होला टी-२० विश्वचषकासाठी संघाचा गोलंदाजी सल्लागार म्हणून निवडले असल्याची घोषणा केली. ब्राव्हो हा आयपीएलमधील चेन्नई सुपर किंग्ज संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक आहे. सीएसकेचा गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून ड्वेन ब्राव्होचा रेकॉर्डही उत्कृष्ट आहे. आता अफगाणिस्तानने त्याला संघाच्या प्रशिक्षक वर्गाचा भाग केल्याने संघाच्या गोलंदाजी आक्रमणाची बाजू अधिक बळकट झाली आहे.

ड्वेन ब्राव्होची आंतरराष्ट्रीय कारकीर्द खूपच चमकदार आहे. त्याने २९५ आंतरराष्ट्रीय साम न्यांमध्ये ६४२३ धावा केल्या आहेत. तर ३६३ विकेटही त्याच्या नावावर आहेत. ड्वेन ब्राव्होला जगभरातील अनेक लीगमध्ये खेळण्याचा तगडा अनुभव आहे. त्याचबरोबर त्याने दोन टी-२० विश्वचषकही जिंकले आहेत. त्याच्या अनुभवाचा अफगाणिस्तान संघाला आगामी वर्ल्डकपमध्ये नक्कीच फायदेशीर ठरेल.

# अमेरिकेचा बांगलादेशवर शानदार विजय

**। अमेरिका । वृत्तसंस्था ।**

**आगामी वर्ल्डकपपूर्वी टी–२० क्रिकेटम ध्ये अमेरिकेने बांगलादेश संघाला पराभूत करत मोठा ठसा उमटवला आहे. टी–२० क्रमवारीत १९व्या क्रमांकावर असलेल्या युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका म्हणजेच यूएसए क्रिकेट संघाने टेक्सासमध्ये जगातील नवव्या क्रमांकावर असलेल्या बांगलादेशचा पाच विकेट्सने पराभव करून सर्वांनाच चकित केले. अमेरिकेने बांगलादेशचा ५ गडी राखून पराभव केला.**



अमेरिकेने बहुतेक वेळ सामन्यात आपले वर्चस्व कायम राखले आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. २०२१ मध्ये आयर्लंडविरुद्धच्या विजयानंतर अमेरिकेचा हा दुसरा टी विजय आहे. यूएसए आणि बांगलादेश हे दोन्ही संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच आमनेसामने आले होते आणि पहिल्याच सामन्यात यूएसएने बांगलादेशला हरवून इतिहास रचला. यंदाच्या टी-२० विश्वचषकातही अमेरिकेचा संघ सहभागी झाला आहे.

बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात अमेरिकेचा भारतीय वंशाचा कर्णधार मोनांक पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशने निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून १५३ धावा केल्या होत्या. एक वेळ अशी होती जेव्हा बांगलादेशची धावसंख्या ११.४ षटकांत ४ विकेट गम ावत केवळ ६८ धावा होती. येथून तौहीद हृदय आणि महमुदुल्लाह यांनी संघाचा डाव सावरला आणि संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले.

जिथे तौहीदने ४७ चेंडूत ५८ धावा केल्या. तर महमुदुल्लाहने २२ चेंडूत ३१ धावांची चांगली खेळी केली. अमेरिकेकडून स्टीव्हन टेलरने सर्वाधिक २ विकेट घेतले. सौरभ नेत्रावलकर, अली खान आणि जसदीप सिंग यांना प्रत्येकी एक विकेट मिळवण्यात यश आले. भारताचा १९ वर्षांखालील माजी क्रिकेटपटू हरमीत सिंगने १५४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेसाठी विजयी धावा केल्या. सलग तीन षटकार मारून त्याने सामना अमेरिकेकडे वळवला. १३ चेंडूत नाबाद ३३ धावा केल्यानंतर तो खेळ संपेपर्यंत मैदानावर राहिला. त्याने कोरी अँडरसनसोबत सहाव्या विकेटसाठी भागीदारी करताना ४.४ षटकांत ६२ धावा जोडल्या. कोरी अँडरसनही ३४ धावा करून नाबाद राहिला. बांगलादेशकडून मुस्तफिजुर रहमानने २ विकेट घेतले. शरीफुल इस्लाम आणि रिशाद हुसेन यांनाही प्रत्येकी १ विकेट मिळाली. अमेरिकेकडून स्टीव्हन टेलरने २८ आणि अँड्र्यू गूसने २३ धावांचे योगदान दिले. अमेरिकेसाठी बांगलादेशवर मिळवलेला विजय त्यांच्यासाठी आगामी विश्वचषकाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

## ऑलिम्पिक कोटा विजेत्या कुस्तीगिरांना निवड चाचणीपासून सूट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय कुस्ती महासंघाने (डब्ल्यूएफआय) सर्व सहा ऑलिम्पिक कोटा विजेत्या कुस्तीगिरांना निवड चाचणीपासून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. ऑलिम्पिक संघनिवडीसाठी आता निवड चाचणीचे आयोजन केले जाणार नसले, तरी हंगेरी येथे जूनम ध्ये होणारी मानांकन स्पर्धा आणि त्यानंतर होणाऱ्या सराव शिबिरात भारतीय कुस्तीगिरांची तंदुरुस्ती आणि लय याचा आढावा घेतला जाईल.

निवड चाचणी न घेण्याचा निर्णय या सध्याच्या परिस्थितीचा विचार करून घेण्यात आला असून हा पायंडा पाडता कामा नये, असे डब्ल्यूएफआयने म्हटले आहे. मानांकन स्पर्धा आणि त्यानंतर सराव शिबिरात कोणत्याही ऑलिम्पिक कोटा विजेत्या कुस्तीगिराची तंदुरुस्ती अपेक्षेप्रमाणे नसल्यास निवड चाचणी घेऊन त्याची/तिची जागा घेण्यासाठी नव्या कुस्तीगिराची निवड केली जाईल, असेही डब्ल्यूएफआयने स्पष्ट केले आहे. पॅरिस ऑलिम्पिककरिता खेळाडूंची नावे पाठवण्यासाठी ८ जुलैपर्यंतची मुदत आहे.

भारतासाठी पुरुषांमध्ये अमन सेहरावत (५७ किलो वजनी गट), तर महिलांमध्ये विनेश फोगट (५० किलो), अंतिम पंघाल (५३ किलो), अंशू मलिक (५७ किलो), निशा दहिया (६८ किलो) आणि रीतिका हुडा (७६ किलो) यांनी ऑलिम्पिक कोटा मिळवला आहे. त्यांनी आपली तंदुरुस्ती आणि लय सिद्ध केल्यास त्यांना थेट पॅरिसचे तिकीट मिळणार आहे. या कुस्तीगिरांनी निवड चाचणी न घेण्याचे डब्ल्यूएफआयला आवाहन केले होते. निवड चाचणीत खेळावे लागल्यास दुखापतींचा धोका उद्भवू शकेल असे या कुस्तीगिरांचे म्हणणे होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)